विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक

यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/ मंगळवार दि. १६ जूलै २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१५१ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

सुविचार

अपने मार्ग में आने वाले किसी भी विघ्न से घबरायें नहीं । हर विघ्न को अन्नति की ओर ले जाने वाली सीढी समझें ।

राज्यसभेत भाजपचे केवळ ८६ खासदार

नवी दिल्ली : भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) यांची राज्यसभेतील ताकद कमी झाली आहे. खासदारांची संख्या कमी झाली आहे. शनिवारी चार नामनिर्देशित सदस्य निवृत्त होत आहेत. हे चारही सदस्य भाजपच्या बाजूने राहिले आहेत. सध्या भाजपच्या राज्यसभेतील खासदारांची संख्या ८६ आहे.

राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या खासदारांची संख्या १०१ झाली आहे. दुसरीकडे, काँग्रेस राज्यसभेत मजबूत होताना दिसत आहे. राज्यसभेमध्ये विरोधी पक्षनेते पद आपल्याकडे घेण्यासाठी काँग्रेस प्रयत्न करत आहे. खासदार राकेश सिन्हा, राम सकल, सोनल मानसिंह आणि महेश जेठमलानी हे निवृत्त होत आहेत. राज्यसभेमध्ये सध्या एकूण २२६ खासदार आहेत आणि १९ जागा रिक्त आहेत.

काय होणार परिणाम?

येत्या बजेटमध्ये भाजपला अनेक विधेयकं मंजूर करून घ्यायचे आहेत. यासाठी भाजपला राज्यसभेतील ७ नामनिर्देशित सदस्य, २ अपक्ष, एआयएडीएमके आणि वायएसआरसीपी पक्षाच्या खासदारांवर अबलंबून राहावे लागणार आहे. दुस-यांवरचे अवलंबित्व कमी करणे आणि नामनिर्देशित सदस्यांची संख्या वाढवणे यावर भाजपचा भर असणार आहे. या दृष्टीने भाजपने काम करणे गरजेचे बनले आहे.

राष्ट्रपती राज्यसभेवर १२ सदस्य नामनिर्देशित करत असतात. सध्या राज्यसभेमध्ये ७ नामनिर्देशित सदस्य आहेत. नामनिर्देशित सदस्य पक्ष निरपेक्ष असतात असा समज आहे. याशिवाय राज्यसभेतील १९ जागा रिक्त आहेत. यात चार नामनिर्देशित, चार जम्मू-काश्मीरमधून, तसेच बिहार, आसाम, महाराष्ट्रातून प्रत्येकी दोन आणि हरियाणा, तेलंगणा, मध्य प्रदेश, राजस्थान आणि त्रिपुरातून १-१ खासदारांचा समावेश आहे. यातील १० जागा गेल्या महिन्यात रिक्त झाल्या आहेत. कारण, काही खासदार लोकसभेवर निवडून आले आहेत.

येत्या काळात ११ रिक्त जागांपैकी ८ जागा भाजपला मिळू शकतात. इंडिया आघाडीच्या पदरात ३ जागा पडू शकतात. तेलगंणातून काँग्रेसला एक जागा मिळू शकते. असं झाल्यास काँग्रेस राज्यसभेतील एकूण संख्याबळ २७ वर जाईल.

संवाद यात्रेच्या माध्यमातून भाजपा राज्यातील कानाकोपऱ्यात पोहचणार

नागपूर : विधानसभा निवडणुकीपूर्वी भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी १९ नेत्यांच्या नेतृत्त्वातील संवाद यात्रेच्या माध्यमातून राज्यातील कानाकोपऱ्यात पोहचणार असल्याची माहिती भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. येत्या २१ जुलै रोजी पुणे येथे महाराष्ट्रातील पाच हजार भाजपा पदाधिकाऱ्यांचे अधिवेशन होणार असून त्यात भाजपाचे नेते केंद्रीय मंत्री अमित शाह, नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत संवाद यात्रेविषयी अंतिम रूपरेषा तसेच तारीख पक्की ठरणार आहे.

ते कोराडी (नागपूर) येथे वृत्तवाहिन्यांच्या प्रतिनिधींशी बोलत होते. पुण्यात होणाऱ्या अधिवेशनात अमित शाह, नितीन गडकरी यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्यातील सर्व

केंद्रीय राज्यमंत्री तसेच प्रदेशातील सर्व प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

संवाद यात्रा

महाराष्ट्रातील भाजपाचे १९ वरिष्ठ नेते संवाद यात्रेत सहभागी होतील. ही यात्रा सर्व ४८ लोकसभा, सर्व विधानसभा तसेच जिल्हा परिषद व पचायत समिती गट आणि नगर पालिका क्षेत्रात पोहचेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी याच्या सरकारने तिसऱ्या टर्ममध्ये घोषित केलेली कामे व महायुती सरकारने अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या कामाची माहिती, सरकारने घेतलेले निर्णय जनसामान्यांपर्यंत पोहचविणार आहोत. समाजातील सर्व घटकांना केंद्र व राज्य सरकारच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला जाणार आहे. या संवाद यात्रेचा समारोप विधानसभानिहाय होणार आहे.

संघटनात्मक बैठक

२१ जुलैच्या पुणे अधिवेशनापूर्वी १९ तारखेला मुंबईत संघटनात्मक बैठक होणार असून महाराष्ट्र विधानसभा पक्ष प्रभारी भूपेंद्र यादव आणि सहप्रभारी अश्विनी वैष्णव ही बैठक घेणार असल्याचेही **(पान २ वर)**

गडावर मद्यप्राशन करणार्या टवाळखोरांना सरकारचा दणका

नागपूर : गडकिल्ल्यांसारख्या ऐतिहासिक आणि पवित्र ठिकाणी जाऊन गैरवर्तन करणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. काही टवाळखोर तरुण पर्यटनासाठी गडांवर जातात आणि त्या ठिकाणी मद्यप्राशन करतात. एवढंच नव्हे तर त्या ठिकाणी घाण, कचराही केला जातो. वास्तूवर काही ठिकाणी नावे कोरली जातात. असं घाणेरडं कृत्य करणाऱ्या टवाळखोरांना आता राज्य सरकार चांगलाच दणका देणार आहे. आधी यासाठी केवळ दंड आकारला जायचा, मात्र आता राज्य सरकार कायदा बदलण्याच्या तयारीत आहे, असे मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले. गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी कठोर पावले उचलली जातील, असं मुनगंटीवार म्हणाले. ते सोमवारी नागपूर येथे प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

यावेळी सुधीर मुनगंटीवार यांनी विशाळगडाच्या पायथ्याशी असलेल्या अतिक्रमणावर कारवाई करणाऱ्या अतिक्रमणविरोधी पथकावर दगडफेक झाल्यासंदर्भात भाष्य केले. भविष्यात मोहीम म्हणून राज्यातील सर्व गडकिल्ल्यावरील अतिक्रमण हटवले जाईल. मी सांस्कृतिक खात्याचा कार्यभार हाती घेतल्यापासून गडकिल्ल्यांसंदर्भात गांभीर्याने काम केले जात आहे. पूर्वी गडकिल्ल्यांच्या डागडुजीसाठी १३ ते १४ कोटी रुपये खर्च व्हायचे. मात्र, यंदा गडकिल्ल्यांच्या देखभालीसाठी ८०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. आगामी काळात सर्व गडकिल्ल्यांवरील अतिक्रमण हटवले जाईल. संबंधित व्यक्तींनी सामोपचाराने ऐकले नाही तर कठोर पाऊल उचलण्यात येईल, असा इशाराही सुधीर मुनगंटीवार यांनी दिला. **(पान २ वर)**

मुख्यमंत्र्यांची मोठी घोषणा पायी वारी करणाऱ्या वारकऱ्यांना मिळणार पेन्शन

मुंबई : आषाढी एकादशी अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपल्यामुळे राज्यात सर्वत्र भक्तीमय वातावरण झाले आहे. अशातच विठ्ठलाच्या नावाचा गजर करत पायी चालत जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक मोठी घोषणा केली आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांनी वारकरी महामंडळ ची स्थापना करणार असल्याची घोषणा केली होती. त्याअंतर्गत आता पायी जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी पेन्शन योजना सुरु करणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले आहे. त्यामुळे वारकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

राज्य सरकार परंपरेने महिन्याची वारी करणाऱ्या वारकऱ्यांना वृद्धापकाळात वारकरी पेन्शन लागू करणार आहे. या योजनेमुळे राज्यभरातील लाखो वारकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी मुख्यमंत्री वारकरी महामंडळच्या वतीने शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

वारकरी महामंडळाचं मुख्यालय हे पंढरपुरात असणार आहे. प्रशासकीय सेवेतील अधिकारी किंवा निवृत्त अधिकाऱ्यांची महामंडळावरती व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती केली जाणार आहे. महामंडळाचं भांडवल ५० कोटी इतकं असणार आहे. तसेच, कीर्तनकारांना आरोग्य विमा कवचही दिलं जाणार आहे.

काय आहे वारकरी महामंडळाचं उद्दिष्ट?

महाराष्ट्रातील तमाम वारकऱ्यांसाठी स्वतंत्र वारकरी महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. यामध्ये वारकऱ्यांच्या प्रश्नांचे निराकरण केलं जाणार आहे. तसेच, वारकऱ्यांना पेन्शन लागू केलं जाणार आहे. या महामंडळाच्या माध्यमातून पंढरपूरच्या विकासाला देखील गती येईल. प्रामुख्याने वारकरी संप्रदायाच्या अडीअडचणी प्रश्न सोडवणे, सर्व पालखी सोहळा मार्गाची सुधारणा करणे, वारकरी भजनी मंडळाला भजन व कीर्तन साहित्य करिता अनुदान देणे अशा **(पान २ वर)**

भुजबळांची पवारांसोबत वेटिंग नंतर मीटिंग

मुंबई : राज्यात पेटलेल्या ओबीसी आणि मराठा आरक्षणाच्या बैठकीच्या मुद्द्यावरुन राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ यांनी काल शरद पवार यांच्यावर जोरदार टीका केली होती. यानंतर आज ते शरद पवारांच्या भेटीसाठी थेट सिल्व्हर ओकवर रवाना झाले. त्यांच्या या भेटीमुळे राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चांना उधाण आलं. मात्र, शरद पवारांची वेळ न घेता थेट भेटीसाठी आल्याने छगन भुजबळांना वेटिंगवर ठेवण्यात आलं होतं. दीड तासांनंतर त्यांना भेटीसाठी आत बोलावलं. त्यांच्यात तब्बल अर्धा तास चर्चा झाल्याची माहिती आहे. या भेटीत नेमकी कोणत्या मुद्द्यांवर चर्चा झाली याबाबत स्वतः छगन भुजबळ यांनी पत्रकार परिषद घेत ए टू झेड माहिती दिली आहे.

छगन भुजबळ म्हणाले, आज पवारसाहेबांकडे सकाळी गेलो होतो. अर्थात त्यांची काही अपॉइन्मेंट वगैरे घेतली नव्हती. फक्त ते घरी आहेत एवढं मला कळलं होतं. साधारण सव्वा दहा वाजता मी गेलो. ते घरी झोपले होते. त्यांची तब्बेत बरी नव्हती.

त्यामुळे मी थोडं थांबलो. ते उठल्यानंतर त्यांनी मला बोलावलं. ते बिछान्यावरच होते. तब्बेत बरी नसल्याने ते उठले होते. साधारण आम्ही दीड तास विविध विषयांवर चर्चा केली. मी त्यांना सांगितलं मी काही राजकारण घेऊन आलेलो नाही, मंत्री म्हणून नाही, आमदार म्हणून आलेलो नाही. कुठली पक्षीय भूमिका माझी नाही.

पुढे भुजबळ शरद पवारांना म्हणाले, महाराष्ट्रात ओबीसींना आरक्षण देण्याचे काम तुम्ही राबवले. परंतु आता राज्यात काही जिल्ह्यांमध्ये फार स्फोटक परिस्थिती निर्माण झाली आहे. काही लोक मराठा समाजाच्या हॉटेलमध्ये जात नाहीत, काही लोक ओबीसी, धनगर किंवा कोणत्याही समाजाच्या दुकानात जात नाही. अशी परिस्थिती राज्यात निर्माण झाली आहे. राज्याचे ज्येष्ठ नेते म्हणून तुमची जबाबदारी आहे की हे सर्व शांत झाले पाहिजे. त्यांना एक आठवण करुन दिली की, बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मराठवाडा विद्यापिठाला देत असताना, मराठवाडा पेटला होता, त्यावेळी शांत करुन तुम्ही निर्णय घेतला आणि सरकारचे जे काही होईल ते होईल, याचा विचार न करता बाबासाहेबांचे नाव दिले.

आजची परिस्थितीहि काहीशी तशीच आहे. तुम्ही बैठकीला आला नाहीत. तर त्यांचे म्हणणे होते की आम्हाला माहिती नाही, जरांगेंना मंत्री आणि मुख्यमंत्री भेटले, त्यांनी काय चर्चा केली, काय आश्वासने दिली माहिती नाही. तुम्ही अखेर ओबीसी नेत्यांची उपोषणे सोडायला गेला, त्यांना काय सांगितले ते सुद्धा आम्हाला माहिती नाही, असे शरद पवारांनी मला सांगितले.

तुम्ही यामध्ये पुढाकार घ्यायला हवा **(पान २ वर)**

सिस्टर कॅम्प चे उद्घाटन मुख्यमंत्री माय डियर सिस्टर योजने' अंतर्गत प्रेरणा होनराव १२ जुलैपासून भारतीय जनता पक्षाच्या वतीने नोंदणीसाठी सिस्टर रूम सुरू केली आहे. लातूर शहरातील माता भगिनी शिबिराचा लाभ घेत आहेत. तसेच लातूरच्या महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था आणि संगमेश्वर चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने मोठ्या प्रमाणात स्वयंसेवकांनी यावेळी मार्गदर्शन करून भगिनी शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. तरुण वर्ग मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन ही योजना आपल्या माता-भगिनींपर्यंत पोहोचवण्यासाठी उत्सुक आहे. हे तरुण मित्र बहिणींसाठी मोठ्या प्रमाणावर काम करत आहेत. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य संजय गवई, मनोज सूर्यवंशी, भाऊ अभिषेक चोरे, स्वामी , डोंगरगे व संस्थेचे मान्यवर उपस्थित होते.

विधानपरिषद सभापतीची निवडणूक कधी

मुंबई,१५ - महाराष्ट्राच्या विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन नुकतच संपले. यावेळी विधानपरिषद सभापतीची निवड कधी लावणार? हा मुद्दा चर्चेत आला होता. शेकापचे जयंत पाटील, काँग्रेसचे भाई जगताप, अभिजित वंजारी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे शशिकांत शिंदे आणि विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी यावरुन सभागृहात प्रश्न उपस्थित केला होता. या निवडणुकीवरुन उबाठा गटाने सत्ताधारी गटाला ऑफरही दिली होती. अखेर यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. अजित पवार मुंबईत पत्रकारांशी अनौपचारीक गप्पा मारत होते. यावेळी अनेक विषयांवर त्यांनी भाष्य केले?

सभापतींची निवड कधी होणार?

महायुतीत राष्ट्रवादीला भाजपची मते मिळते नाहीत यावर देखील अजित पवार यांनी स्पष्टीकरण दिले. रायगड लोकसभा म तदारसंघात आम्हाला भाजपची मते मिळाली. त्यामुळे मते ट्रान्स्फर होत नाहीत असे म्हणणे चुकीचे आहे. आगामी विधानसभा निवडणुकांत देखील अशीच परिस्थिती असेल, असा दावा अजित पवार यांनी केला. दरम्यान, अजित पवार यांची अनौपचारिकपणे बोलताना सांगितले की राज्यपाल नियुक्त १२ आमदारांच्या निवडीनंतरच सभापतींची निवड होणार आहे.

विधान परीषद सभापती पदाची निवडणूक बिनविरोध घ्यावी अशी विनंती उबाठा गटाचे आमदार अनिल परब आणि अंबादास दानवे यांनी पावसाळी अधिवेशनात केली होती. आपण नाव द्या आम्ही ते बिनविरोध देवू, पण सभापती पदाची निवडणूक याचं अधिवेशनात घ्या'' अशी विनंती उबाठा गटाच्या आम दारांनी केली होती. विधान परीषद सभापती करता उबाठा गटातून शिवसेनेत आलेल्या उपसभापती निलम गोऱ्हे यांचे नाव चर्चेत आहे. अनिल परब आणि अंबादास दानवे यांनी बिनविरोध सभापती निवडणूक घ्या असे बोलल्याने मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सर्वांची एकत्रित बैठक लावली होती.

शेतकरी कामगार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी विधानपरिषदेच्या सभापती **(पान २ वर)**

हिरेमठ संस्थानचेवतीने विविध उपक्रमाचे आयोजन

औसा/ प्रतिनिधी- हिरेमठ संस्थान औसाचे वतीने प्रती वर्षा प्रमाणे ८४ वा वार्षिक महोत्सव शिवदिक्षा सोहबा व अखंड शिवनाम सप्ताह ६ जुलै २०२४ पासून आयोजित करण्यात आला आहे.

शिव दिक्षा सोहळा ३१ जुलाई रोजी तर १ ऑगस्ट रोजी उज्जयनीचे महास्वामीजी श्री सिद्धलिंग राजदेशिकेंद्र शिवाचार्य व काशी पिठाचे नूतन महास्वामी डॉ. मल्लिकार्जुन शिवाचार्य यांचे आशिर्वचन व महाप्रसाद आयोजित करण्यात आले आहे. असे वीरशैव समाज औसाचे अध्यक्ष श्री. सुभाषअप्पा मुक्ता यांनी कळवले आहे.

लातूर हरितोत्सव मध्ये आबालवृद्धांनी केली रोपांची खरेदी

लातूर, / प्रतिनिधी- शहरातील आणि परिसरातील नागरिकांमध्ये वृक्ष लागवडीसाठी जनजागृती करून त्यांना एकाच ठिकाणी विविध प्रजातीच्या झाडांची रोपे उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासन, पर्यावरण प्रेमी संघटना आणि व्यापारी संघाच्यावतीने लातूर हरितोत्सव चे आयोजन करण्यात आले होते. पहिल्यांदाच होत असलेल्या या अभिनव उपक्रमात सहभागी होत आबालवृद्ध लातुकारांनी पर्यावरण संवर्धनाच्या चालवलीत सामील होत वृक्ष लागवडीचा निर्धार केला. यासाठी आपापल्या आवडीच्या झाडांची रोपे खरेदी करण्यासाठी नागरिकांनी गर्दी केल्याचे दिसून आले.

लातूर हरितोत्सव ची सुरुवात सकाळी वृक्षदिंडीने झाली. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्या हस्ते वृक्षदिंडीला सुरुवात झाली. यामध्ये विविध शाळांच्य विद्यार्थ्यांसह शहरातील पर्यावरण प्रेमी संघटनांनी आणि नागरिकांनी सहभाग घेतला. एक एक झाड लावू मतेनं, फुलवूया रान सारं हिमतीनं... या गीताच्या माध्यमातून वृक्षदिंडीतील बालगोपाळांनी वृक्ष लागवडीचे आवाहन केले. तसेच वारकऱ्याच्या वेशभूषेत दिंडीत सहभागी झालेल्या नागरिक आणि ज्ञानप्रकाश संकुलच्या विद्यार्थ्यांनी विठ्ठल विठ्ठला... झाडे लावा, झाडे जगवा चा संदेश दिला.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय गिरी, नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे, उप विभागीय कृषी अधिकारी दिलीप जाधव, आर. एन. काळे यांनीही टाळ-मृदुंगाच्या तालावर दिंडीत विठ्ठल नामाचा जयघोष करीत ठेका धरला. तर या दिंडीत सहभागी झालेल्या महिलांसह उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे सौ. भाग्यश्री पाटील यांनी फुगडीमध्ये सहभाग घेतला. दयानंद कला महाविद्यालयाच्या चमूने यावेळी वृक्ष लागवडीचे महत्व पटवून देणारे पथनाट्य सादर करून उपस्थितांना पर्यावरण संवर्धनाचे आवाहन केले.

लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, सहायक वनसंरक्षक वैशाली तांबे, सामाजिक वनीकरण विभागाचे विभागीय वन अधिकारी अमिताराज जाधव, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रमेश जाधव, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे, महानगरपालिका उपायुक्त शुभम क्यातमवार, नायब तहसीलदार परवीन पठाण, शिक्षण विभागाचे मधुकर **(पान २ वर)**

मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण योजनेसाठी ८१ हजार अर्ज प्राप्त : जिल्हाधिकारी

लातूर, / प्रतिनिधी- मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेसाठी प्रत्येक गावात आणि शहरी भागात अर्ज स्वीकृती केंद्र सुरु करण्यात आली आहेत. तसेच १२ जुलै रोजीच्या शासन निर्णयानुसार अर्ज प्रक्रिया सुलभ करण्यात आली आहे. हे बदल लक्षात घेवून योजनेसाठी अर्ज छाननी आणि ऑनलाईन नोंदणीला गती गती देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे दिल्या. मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित तालुकास्तरीय अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या.

प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगीता टकले, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय गिरी, जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम अधिकारी जावेद शेख, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक कल्पना गिरी, नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे, समाज कल्याण सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते यांची यावेळी उपस्थिती होती.

सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते. जिल्ह्यात आतापर्यंत ८१ हजार २२५ अर्ज प्राप्त झाले आहेत. यापैकी ३५ हजार २६६ अर्ज ऑनलाईन करण्यात आले असून ४५ हजार ९५९ अर्ज ऑनलाईन करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

योजनेसाठी पात्रतेच्या निकषात करण्यात आलेल्या बदलांबाबत ग्रामीण, शहरी भागात व्यापक जनजागृती करण्यात यावी. तसेच ग्रामीण भागात अंगणवाडी सेविका, आशा सेविका, ग्रामसेवक, रेशन दुकानदार, तलाठी, कृषि सहायक, महिला बचतगटातील प्रेरिका (सीआरपी) यांच्यामार्फत नाव **(पान २ वर)**

दैनिक
यशवंत
मंगळवार दि.१६ जुलै २०२४
२
अहमदपूर/चाकूर परिसर
E-mail :- yashahmedpur@gmail.com संपर्क मो.९८५०२७३०४७, ९८२३११२९०७

शाळाबाह्य कामानी सरकारी शाळा बेजार?

शिरुर ताजबंद दि.१५ (पूर्ण श्रीमंगले) शाळाबाह्य कामानी सरकारी शाळा बेजार? होत असल्याची परस्थिती निर्माण झाली आहे.

याबाबत अधिक माहिती अशीकी, शाहू फुले आंबेडकरांच्या महाराष्ट्रात गोरगरिबाच्या मुला मुलींना वाडी- तांडा गाव खेड्यात सर्वदूर शिक्षणाची गंगा सरकारी शाळातून वाहते त्यास अनेक प्रकारची अशैक्षणिक शैक्षणिक मंत्रालयाचा सर्वच विभागातून सतत माहिती मागविण्याच्या उद्याशाने सरकारी शाळा बाह्यकामानी बेजार झाले आ-हेत. याकडे शिक्षण तज्ञ लक्ष केव्हा देणार असाही ग्रामीण भागातील पालक शिक्षकातून प्रश्न विचारला जात आहे.

शिक्षकांना सततची ऑनलाईन पाचवी आठवी शिष्यवृत्ती ,नवोदय स्पर्धा परीक्षा ,हॉल तिकीट, फॉर्म प्रवेश वृक्षारोपण अहवाल पायाभूत चाचणी स्टुडंट पोर्टल वरील सर्व कामे झूम मीटिंग कोणत्याही कारणासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या माहिती वितरणासाठी घेऊन मीटिंग घेतली जाते यातून शाळांची मुख्याध्यापकांची तारांबळ उडते दहावी, बारावीच्या परीक्षेसाठी प्राथमिक शिक्षकांना कामासाठी महाराष्ट्रातील लाखोच्या संख्येने वापरले जाते शालेय पोषण आ-हार ,तांदूळ मागणी वजन करून उतरून घेणे व्यवस्थित धान्य साठा करणे , स्वयंपाकी नेमणूक मेडिकल घेणे इत्यादी कामे करावी लागतात. पाणीपुरवठा शालेय पोषण आहारासाठी ,शुद्ध पाणीपुरवठा ठेवून आहार वाटप स्वच्छता ,पाण्याची शुद्धता वारंवार तपासणी करावी ला-गते. मुतारी ,शौचालय व शाळा परिसर वर्ग खोली स्वच्छता ,शालेय आरोग्य तपासणी ,शाळा व्यवस्थापन समिती बैठका बोलावणे इतिवृत्त लेखन ही सर्वच कामे मुख्याध्यापकांना करावी लागतात . गावोगावी विद्यार्थी पळविण्याची स्पर्धा , इंग्रजी शाळांचा सुळस-ुळाट , खेडोपाडी इंग्रजी शाळांना परवानगी दिल्याने गणवेश ,बूट ,सॉक्स आणि बस टेम्पो आदीने प्रवास याला पालक भुलतात आणि रक्कम मोजून इंग्रजी शाळेत पाठवितात .पुरेशे मैदान,इमारत , तज्ञ शिक्षक मुतारी शौचालय काही मोजक्या शाळा कडे असते .आरटीई २००९ चा कायदा शासनाची टप्पे मागणी, परीक्षेत नापास करण्यावर बंदी इंग्रजी शाळांना लागून नसल्याची वाटते. सरकारी शाळांना एवढे काम करून शिक्षण अभ्यासक्रम गुणवत्ता याकडे लक्ष देण्यास कमी वेळ मिळतो . वारंवार रिक्त होणाऱ्या जागा ,शिक्षक पदवीधर, मुख्याध्यापक ,केंद्रप्रमुख ,विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी या शिक्षणासाठी महत्त्वाच्या जागा दहा-बारा वर्षे रिक्त राहतात .त्यामुळे नवीन शिक्षक भरती होत नाही शिक्षण विभागाचा कार्यभार प्रभारीवर चालतो. पर्यायाने शिक्षणाची वाटोळे होत आले आहे . म्हणून सर्वसामान्यांच्या मुला बाळांना दर्जेदार इंग्रजी माध्यमाचे शिक्षण, टप्पा विहिरीत शाळा, शून्य टक्के रिक्त जागा सातवी पर्यंतच्या शाळेत एक सेवक केंद्रीय शाळेत एक लिपिक शिक्षकांना फक्त शिकविण्याचे काम द्यावे असे घडले तर मराठी शाळा भविष्यात टिकणार आहेत अन्यथा सरकारी मराठी शाळा शेवटची घटका मोजतील.

वारी समतेची, दिंडी वृक्षारोपणाची, पंढरपुराकडे प्रस्थान

प्राचार्य डॉ.वसंत बिरादार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरीच्या वारीत राबविला अभिनव पर्यावरणपूरक वृक्षारोपणाचा उपक्रम

अहमदपूर दि.१५ (बालाजी कारामुंगीकर) येथील महात्मा फुले महाविद्यालयाच्या वतीने पंढरपूरच्या आषाढी वारीमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली व डॉ.मारोती कसाब आणि डॉ. किरण गुट्टे यांच्या नेतृत्वाखाली आषाढी दिंडी मार्गात जागोजागी वृक्षारोपण करण्यासाठी मवारी समतेची , दिंडी वृक्षारोपणाची या उपक्रमाखाली पंढरपूरकडे प्रस्थान झाली.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत महात्मा फुले महाविद्यालय निरंतर सामाजिक , सांस्कृतिक , क्रीडा तसेच पर्यावरण पूरक विविध क्षेत्रांमध्ये प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले. त्याचाच एक भाग म्हणजे किसान शिक्षण प्रसारक मंडळ उदगीर चे अध्यक्ष श्रीरंगराव पाटील एकंबेकर, सचिव पी.टी. शिंदे तसेच सर्व पदाधिकाऱ्यांच्या परवानगीने वारी समतेची, दिंडी वृक्षारोपणाची हा उपक्रम हाती घेऊन दि. १२ जुलै २०२४ रोजी महाविद्यालयातून महाविद्यालयातील महिला प्रा. डॉ. सीमा उपलवाड, प्रा. कल्पना कदम, प्रा. प्रती-क्षा मंडोळे यांनी मऔक्षणफ केल्या नंतर या दिंडीचे प्रस्थान पंढरपूरकडे झाले.

जागोजागी वृक्षारोपण

विशेष म्हणजे दिंडी मार्गावर तुळजापूर तालुक्यात सांगवी येथे तुळजापूर च्या शक्तीपीठ दिंडीचे महंत रामेश्वर स्वामी यांच्या हस्ते वृक्षारोपण करून वृक्षारोपणाची सुरुवात करण्यात आली. तसेच मोहोळ तालुक्यात उपळी या गावी गावातील ज्येष्ठ दांपत्य चांगदेव सुर्वे व सौ. मालनबाई चांगदेव सुर्वे यांच्या हस्ते तसेच पंढरपूर तालुक्यातील डेरला - वारला या गावी महात्मा फुले महाविद्यालयातील इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. डॉ . किरण गुट्टे यांचे आई वडील ज्येष्ठ वारकरी सौ. गयाबाई वामनराव गुट्टे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले व समता दिंडी पंढरपूरकडे प्रस्थान झाली. यावेळी प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्यासह डॉ . मारोती कसाब , उपप्राचार्य डॉ. दुर्गादास चौधरी, ह . भ . प .प्रो. डॉ . अनिल मुंढे महाराज, डॉ. सतीश ससाणे, प्रो.डॉ.नागराज मुळे, प्रो. डॉ. अभिजीत मोरे , डॉ.किरण गुट्टे, डॉ .पांडुरंग चिलगर, डॉ. बब्रुवान मोरे , डॉ .डी . एन .माने , डॉ . प्रकाश चौकाटे , डॉ . प्रशांत बिरादार , ग्रंथपाल प्रा .परमेश्वर इंगळे ,डॉ . संतोष पाटील , प्रा .प्रकाश गायकवाड, कार्यालय प्रमुख प्रशांत डोंगळीकर ,अजय मुरमुरे, चंद्रकांत धुमाळे , चंद्रकांत शिंपी आदिंनी दिंडीमध्ये सहभाग नोंदवून भजन कीर्तनासह सोहळ्याचा आनंद घेत पर्यावरण पूरक उपक्रम राबविला.

शेतकऱ्यांच्या मुलाची महाराष्ट्र पोलीसात निवड, अजय चंद्रकांत पाटीलांचे सर्वत्र अभिनंदन

अहमदपूर दि.१५(बालाजी कारामुंगीकर): शेतकऱ्याच्या मुलाची महाराष्ट्र पोलीस निवड झाली असल्याने सर्व स्तरा-तुन अजय चंद्रकांत पाटील यांचे अभिनंदन होत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी कीख, मांजरा नदी काठी असलेले निलंगा तालुक्यातील हंचनाळ हे गाव एका शेतकऱ्याचा मुलगा दररोज शेतीमध्ये काबाडकष्ट करणारा शेतीची सर्व कामे येणारा. आपली कामे करून संध्याकाळी घरी अभ्यास करून अजय चंद्रकांत पाटील या मुल-ाने पोलीस भरतीमध्ये तयारी करून मैदानावर व लेखी परी-क्षेत चांगले गुण संपादन केले व त्याची निवड महाराष्ट्र पोलीस मध्ये झाली.

तेव्हा पूर्ण गा-वाने त्याला डोक्यावर घेतले त्याची गावामध्ये मिरवणूक काढण्यात आली. त्याला खांद्यावर घेऊन नाचण्यात आले. आई-वडिलांचा सत्कार केला हे माझ्या गावचे यश. आणखी ग्रामीण भागात माणुसकी जिवंत आहे एकमेकांच्या सुखदुःखामध्ये सर्वजण सहभागी होतात.

प्रयत्नांती परमेश्वर हे त्यांनी दाखवून दिले आहे. जिद्द, चिकाटी, कष्ट, सातत्य हे गुण तो शेतीमधून शिकला येणाऱ्या संकटांना सामोरे जाऊन आपण मनातून प्रयत्न केले तर नक्कीच यशस्वी होऊ शकतो हे याचे उदाहरण.

गावचे वैशिष्ट्य गावामध्ये असंच जिद्द चिकाटीच्या जोरावर पांचाळ कुटुंबातले तिन्ही मुलं सरकारी नोकरीमध्ये लागली. तसेच चार-पाच पोलीस झाले त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून अजय यांनी प्रयत्न केले आणि तो यशस्वी झाला. तरुण मुलासाठी अजय आणि गावातील तरुणांचा नोकरदार तरुणांचा विशेषता आदर्श घेऊन नक्कीच पुढची पिढी यशस्वी होईल याची मला खात्री आहे.

टी.सी. हरवली आहे
छाया माधव खडके , या नावाची य भवानी विद्यालय हालकी ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर या विद्यालयाची बारावी पास पासची टी.सी. व मार्क मेमो नळेगाव ते चाकूर प्रवासात दि. ११ जुलै २०२४ रोजी हरवली आहे. सदरील टी.सी. व मार्क मेमो कोणास सापडल्यास खालील मोबाईल नंबरवर संपर्क करावा. मो. नं. ९२८४८१५८६६

टी.सी. हरवली आहे
ऋतुजा रविंद्र मंदाडे या नावाची महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर या महाविद्यालयाची बी.एस्सी. तृतीय वर्ष एटीकेटीची टी.सी. व १०, १२ वी पासचा मार्क मेमो अहमदपूर ते शिरुर ताजबंद प्रवासात दि. ११ जुलै २०२४ रोजी हरवली आहे. सदरील टी.सी. व मार्क मेमो कोणास सापडल्यास खालील मोबाईल नंबरवर संपर्क करावा. मो. नं. ९३०७७३४४८५

प्रभाग क्र. ४ मध्ये आगलावे यांच्या वतीने लाडकी बहीण योजनेचे शिबिर

अहमदपूर दि.१५(बालाजी कारामुंगीकर): प्रभाग क्र. ४ मध्ये आगलावे यांच्या वती-ने लाडकी बहीण योजनेचे शिबिर घेण्यात आले.

याबाबत अधिक माहिती अशी की, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने-चे अर्ज भरणे, स्वीकारणे आणि लागलीच ऑनलाईन करणे याबाबतचे शिबिर प्रभाग क्रमांक चार, पंचमुखी हनुमान मंदिर, ना-गेश कॉलनी अहमदपूर येथे माजी नगरसेविका कमलबाई आगलावे यांच्या वतीने आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात प्रभागातील गोर गरीब महिलांनी तब्बल २०० फॉर्म भरून लाभार्थ्यांनी मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचा मोफत लाभ घेतला आहे.

या कामासाठी अंगणवाडी कर्मचारी श्रीमंती तांबरे, नगरपरिषद कर्मचारी शेवाळे, शिवराम सोलापूरे व आदित्य ससाने, सिद्धेश्वर देवकते आदी कर्मचारी यांनी उपस्थित राहुन योग्य ते सहकार्य केले आहे. शिबिर हे मोफत अर्ज स्वीकारणे व भरणेसाठी घेण्यातआले होते. सदरील शिबीर सामाजिक कार्यकर्ते बालाजी प्रकाश पाटील (आगलावे) माजी बांधकाम सभापती कमलाबाई प्रकाश आगल-ावे यांच्यावतीने आयोजित करण्यात आले होते.

तूप : आयुष्यवर्धक अनेक पोषक तत्वांचा खजिना

जेवण कसलेही असो, पंगतीला तूप वाढले कि मगच जेवायला सुरुवात करायची आपली परंपरा आहे, एकंदरीत तूप हा स्वयंपाकघरातला एक अविभाज्य घटक आहे..

तुपः ।। घ्रुतम् आयुः।। सहस्रवीर्य विधिभिघ्रुतं कर्मसहस्रक्रुत्।।

ज्याच्या आहारात थोड्या फार प्रमाणात तुप रोज आहे तो निरोगी आयुष्य दिर्घकाळ जगतो. सर्व प्रकारच्या स्निग्ध पदार्थात तूप हे सर्वश्रेष्ठ आहे.. शरीराची दर क्षणाला झिज होत असते, ती भरून यायला शरीरात स्निग्धता ला-गते.. सात धातूंमध्ये मज्जा हा धातू सर्वात श्रेष्ठ धातू होय. शरीराच्या ठिकठिकाणाच्या कार्यास तुपाची मदत मोठी होते, आयुर्वेदाप्रमाणे तूप हे आयुष्यवर्धक व मधूर रसाच्या पदार्थात श्रेष्ठ आहे, शरिराला तुपामुळे स्थैर्य मिळते, बुद्धि, धारणा शक्ति, स्मरणशक्ति वाढवणे याकरता तूप माफक प्रमाणात रोज घ्यावे.

घ्रुत हे शित गुणांचे असून वात व पित्त विकारात काम करते, अरूची, भूक न ला-गणे, अग्निमांद्य, या विकारात अग्निवर्धन होते, शीतपित्त, व गांधी उठणे या विकारात, तुपात कालवून मिरेपुड लावली तर अंगाची खाज कमी होते,

आम्लपित्तात, नियमाने सकाळी व संद्याकाळी पंधरा ग्रँम तूप घ्यावे, स्रियांच्या प्रदर विकारात गुणकारी आहे, क्रूश व्यक्तिने कंबरदुखी, गुडघेदुखी, सांधेदुखी यावर थोडे तुप गरम पाण्याबरोबर घ्यावे,

ज्यांचा कोठा रुक्ष आहे, बद्धकोष्ठ आहे, त्यांनी रोज रात्री एक कप गरम दुधासोबत एक चमचा तूप घ्यावे.

कान सतत वाहणे, कानात आवाज येणे, कान कोरडे पडणे, तसेच डोळे रूक्ष होणे, डोळ्यांचा वाढता नंबर, डोळे लाल होणे, या विकारात रसायनकाली म्हणजे सकाळी, वीस ग्रँम तूप खावे..

उष्णतेने केस गळत असल्यास, केसात खवडे, चाई, फोड होत असल्यास, नियमित तूप खावे, कुरूप या विकारात कुरूप कापण्यापेक्षा, शतघौत तुप तिथे घासावे, बरे होतात. शांत झोपेकरता, तळपायाला, कानशिल, कपाळपट्टि, यांना तूप चांगले जिरवावे.

वात, गुल्म, पोटात फिरणारा वायू गोळा याकरता जेवणाच्या सुरुवातीला तूप चमचाभर खाउन जेवण संपतांना पुन्हा चमचाभर खावे. श्वशरिरातील कोणतिही जखम भरून येण्यास व आतड्यातील व्रण भरण्यास तुपाचे सेवन गुणकारी आहे..

क्रुश व्यक्तिच्या छातीत दुखणे, क्षयरोग, थुंकीतून रक्त पडणे, कडकी, बारीक हाडे ताप या विकारात नेमाने तुप खावे, बल मिळते,. सततची डोकेदुखी, असल्यास नाकपुडीत दोन थेंब तुपाचे टाकावे,

तोंड आल्यास, अल्सर झाल्यास जिभेला तुप चोळावे. त तोंडात तुप धरावे, श्वत्वचा विकारात , खाज व आग, थांबवण्याकरता, विशेषतः सोरायसिस मद्ये तुप खाणे लाभदायी आहे,

समस्त विषविकारात पोटात घेण्यासाठी तुपासारखा उपाय नाही, विषाच्या दहा गुणाविरूद्ध लढा देण्यास तुपा-चे दहा गुण आहेत, चुकिच्या औषधांचे परिणाम डोळ्यावर, त्वचेवर, केसांवर, किडनीवर, झाल्यास , सकाळी तूप घ्यावे.

फिटस् येणे, आकडी, विस्मरण, उन्माद, या वातविकारात, पोटात तूप घ्यावे, तळहात, पाय, कानशिले, यांना तूप घास-ावे, लकवा, तोंडावरून वारे जाणे, तोंड वाकडे होणे, या विकारात, नाकात दोन थेंब तुप टाकावे, डोळ्यात टाकावे

मूळव्याधीत गरम दूधात तुप घालून प्यावे, वारंवार गर्भपात होत असल्यास तूपाचे नियमित सेवन केल्यास गर्भाशय बलवान होते, कँसर व्याधित केमोथेरपी, रेडिएशन, यांचे दुष्परिणाम टाळण्याकरता तूपाचे सेवन करावे. शुद्ध तुप-ाने चेहऱ्यावर मालिश केल्यास चमकतो, मुलायम राहतो,

डाळ शिजतांना तूप टाकल्यास गँस होत नाही. तुपामध्ये विटामिन ए. डी. व कँलशिअम, फाँस्फोरस, मिनरल्स, पोटँशिअम, असे अनेक पोषक तत्वे असतात,

तेव्हा, आपल्या आहारात नक्कीच तूप कायम असावे. देशी गाईचे तूप अतिउत्तम.

आयुर्वेदाचार्य
डॉ.प्रवीण बढे
पद्मश्री नामांकन २०२४

कबीरवाणी

कहते को कही जान दे,
की सीख तू लेय।
साकट जन औश्वान को,
फेरि जवाब न देय।

भावार्थ : संत कबीर म्हण-तात कि, समाजामध्ये काही असे लोक असतात ते कधीही सरळ बोलत नाहीत, सदैव उलटे बोलत असतात. तर अश्या उलटे बोलणाऱ्यांना उलटे बोलत राहु द्या.

तुम्ही मात्र त्यांना पलट उत्तर न देता गुरुने सांगितले जे नैतिक विचार आहेत ते आत्मसात करा जसे साकट म्हणजेच दुष्ट बोलत असतांना आणि कुत्रे भुंकत असतांना त्यांना उलट उत्तर द्यायचे नसते. अगदी तसेच गुरुची शिक्षा लक्षात ठेवून उलट बोलणाऱ्यांना उत्तर देवू नये. हे शहाणपणाचे लक्षण नाही आहे असा सल्ला संत कबीर या दोह्यातून समाजाला देतात.

डॉ. बालाजी कारामुंगीकर
मो . ९८२३११२९०७

बढता चल

जीवन में आऐंगी कई दिक्कते
उसे पार करते तू बढता चल
हर कठिणाई का सामना करते
जीवन की राह पर बढता चल
जीवन आगे बढ़ने के लिए है
तू रुक मत, हरसभव बढ़ता चल
राह में कोई सहारा-दे-या न दे
प्रकृति के संग घुल-मिलकर
हर कदम गतिमान कर
बस... आगे बढता चल
मंजिल मिलेगी तुझे
खुद पर विश्वास कर
राह के काटों पर चलकर ही
मिलेगा सफलता का शिखर
इसलिए मायुस कभी न हो
हर हाल में आगे बढता चल
मंजिल तुझे सामने दिखेगी
हाथ से तेरे फिसल जाऐगी
तू निराश न होकर फिरसे
उसे पाने कोशिश कर
बस... आगे बढता चल
कामियाबी से तेरी चकित होंगे
बधाईयों की भरमार होगी तुझपर
विचलित न होना इससे
और कही रुक न जाना
बढना जिंदा दिली है
इसलिए रुकना न कभी
मंजिल पाने के बाद भी
बस.... आगे बढता चल...

डॉ. बालाजी कारामुंगीकर
मो.नं. ९८२३११२९०७

यशवंत
धाराशिव जिल्हा
मंगळवार दि. १६ जुलै २०२४
३
कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

डॉ.आकाश माने यांचा अनसुर्डा येथे सत्कार

धाराशिव दि.१५ (प्रतिनिधी) – तालुक्यातील अनसुर्डा येथील डॉ.आकाश अरुणराव माने यांनी रशियातील प्रिव्होल्झस्की रिसर्च मेडिकल युनिव्हर्सिटीतून एम.बी.बी.एस. पदवी यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल त्याचा सत्कार करण्यात आला. एमबीबीएस शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ते गावी परत आले असता भोलेसिंग गिरासे, सुरज काझी, भाऊसाहेब मनगिरे, जीवनराव देशमुख, सचिन शित्रे, उद्धव अवचार यांनी सत्कार केला. यावेळी माजी सरपंच अरुणराव माने यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

समाजवादी पार्टी विधानसभेसाठी ३५ जागा लढविणार - होगाडे

धाराशिव दि.१५ (प्रतिनिधी) – नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये समाजवादी पार्टी देशात तिसऱ्या क्रमांकावर व इंडिया गाडीमध्ये दुसऱ्या क्रमांकावर पोचलेले आहे. आगामी विधानसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रात ३५ जागा लढविणार असल्याची माहिती समाजवादी पार्टीचे प्रदेश कार्याध्यक्ष तथा महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेचे अध्यक्ष व वीज तज्ञ प्रताप होगाडे यांनी दि.१४ जुलै रोजी दिली. विशेष म्हणजे ऊर्जा मंत्र्यांनी प्रीपेड मीटर संदर्भात जे उत्तर दिलेले आहे. त्यामधून काही महत्त्वाचे प्रश्न निर्माण होत असल्याचे सांगत ते म्हणाले की स्मार्ट प्रीपेड मीटर्स लावल्यामुळे वाणिज्यिक हानी कमी होईल आणि त्यामधून संबंधित निविदा धारकांना द्यायची रक्कम बागोळी जाईल तसेच ग्राहकावर कोणताही पूजा येणार नाही असे त्यांनी सांगितले.

धाराशिव शहरातील शासकीय विश्रामगृहात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष डीपी जोशी पाटोदेकर प्रधान महासचिव परवेज सिद्दिकी महासचिव अब्दुल राऊफ, ऍड रेवण भोसले, नांदेड जिल्हाध्यक्ष हैदर पटेल, शाहूराज खोसे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना होगाडे म्हणाले की,

लोकसभेत समाजवादी पार्टीच्या सर्व नवनिर्वाचित ३७ खासदारांचा सत्कार १९ जुलै रोजी मुंबई येथील इस्लाम जिमखाना येथे करण्यात येणार आहे. तर ऑगस्ट क्रांती दिन दि.९ ऑगस्ट रोजी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अखिलेश यादव यांच्या जाहीर सभेचे मालेगाव येथे आयोजन करण्यात आले आहे. तर महाराष्ट्रात समाजवादी पार्टीचे जेथे उत्तम काम उत्तम जनाधार संघटन व प्रभा क्षेत्र आहे अशा जागा लढविण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. पूर्वतयारी म्हणून पक्षाच्यावतीने संबंधित सर्व विधानसभा मतदार संघांमध्ये दौरे व बैठक सुरू करण्यात आल्या असल्याची माहिती त्यांनी दिली. मात्र त्या जागा कोणत्या असतील याबाबत प्रदेशाध्यक्ष आमदार अब्बू आझमी व राष्ट्रीय अध्यक्ष अखिलेश यादव यांच्याशी चर्चा करणार असून त्यानंतर अंतिम निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी सांगितले. तसेच उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत व विधान परिषदेत महाराष्ट्रामधील सर्वसामान्य वीज ग्राहकांना प्रीपेड स्मार्ट मीटर बसविण्यात येणार नाहीत, असे आश्वासन दिले आहे. अशीच घोषणा त्यांनी यापूर्वी १५ जून रोजी भाजपाच्या पदाधिकारी बैठकीत केली होती. तेव्हापासून आज अखेर या संदर्भात कोणताही अधिकृत निर्णय झालेला नाही. तसेच राज्य शासन अथवा महावितरण कार्यालयातून याबाबत अधिकृतरित्या कोणीही काही सांगत नाही. त्यामुळे केवळ निवडणुका आहेत म्हणून अशी वक्तव्य केली जात आहेत की काय ? असा समज सर्वसामान्य वीज ग्राहकांमध्ये संभ्रम निर्माण झाला असल्याचे त्यांनी सांगितले. हा संभ्रम दूर करण्यासाठी फडणवीस यांनी त्वरित आपल्या घोषणेची अधिकृतरित्या अंमलबजावणी करावी असे आवाहन त्यांनी केले. त्यासाठी महावितरण कंपनीस आदेश द्यावेत अथवा राज्य सरकार मार्फत शासन निर्णय जाहीर करावा अशी मागणी त्यांनी केली.

स्मार्ट प्रीपेड मीटर्स लावल्यामुळे वाणिज्यिक हानी कमी होईल व त्यामधून संबंधित निविदाधारकांना द्यायची रक्कम भागवली जाईल. याचा ग्राहकांवर कोणताही बोजा येणार नसल्याचे सांगितले जात असल्याचे त्यांनी नमूद केले. तथापि, प्रत्यक्षामध्ये मीटरमुळे वाणिज्यिक हानी रोखताच येत नाही. कारण मीटर हा दिलेल्या विजेचा वापर किती झाला आहे ? ते मोजण्याचे काम करीत असल्याचे त्यांनी सांगितले. वाणिज्यिक हानी मीटरद्वारे मोजता येत नाही, थांबवता येत नाही व कमीही करता येत नाही. सर्विस लेव्हल एग्रीमेंट प्रमाणे पुरवठादराला १० वर्षे प्रती मीटर दिली जातील असे त्यांनी सांगितले. दहा वर्षे ही रक्कम कंपनीच्या खर्चामध्ये येणार असल्यामुळे या रकमेचा बोजा ग्राहकावरच येणार आहे. त्यामुळे ग्राहकांकडून वसुली केली जाणार नाही हे म्हणणे पूर्णपणे चुकीचे असल्याचा ठाम दावा त्यांनी केला. सद्यस्थितीमध्ये प्रीपेड मीटर फक्त सबस्टेशन्स फीडर्स ट्रान्सफॉर्मर आणि सरकारी कार्यालय येथे लावली जातील असे सांगितले जात आहे. या सर्व ठिकाणी एकूण जास्तीत जास्त १५ लाख मीटर लागतील असे असताना प्रत्यक्षात सव्वा दोन कोटी मीटरची ऑर्डर का दिली ? याचे कारण उत्तरामध्ये कुठेही दिलेले नसल्याचा आरोप त्यांनी केला. ३ वेळा ग्राहकांना मीटर्स लावणार नाही अशी फक्त घोषणा झाली, परंतू अद्यापही ऑर्डर्स रद्द केलेल्या नाहीत. त्यामुळे खरा हेतू वेगळा आहे की काय अशी शंका निर्माण करते २५ कोटी रुपयांच्यावरील कोणत्याही भांडवली खर्चाच्या योजनेस आयोगाची पूर्वपरवानगी घेणे बंद करत असल्याचे त्यांनी सांगितले. २७०० कोटी रुपयांच्या मीटरच्या टेंडर्ससाठी पूर्व मान्यता का घेतली नाही ? याचे उत्तर फडणवीस किंवा महावितरण यापैकी कोणीही दिलेले नाही. फक्त सरकारी कार्यालयात प्रीपेड मीटर्स लावल्यामुळे वाणिज्यिक आणि कमी होईल असे ग्राह्य धरलं तर त्याचा अर्थ असा होतो की वाणिज्य कहाणी फक्त सरकारी कार्यालयांमध्येच आहे आणि ती खूप मोठ्या प्रमाणामध्ये आहे व त्यामधून मोठ्या प्रमाणामध्ये उत्पन्न येणार आहे. तसेच निविदाधारकांची देवीचे भागवली जाणार आहेत असा अर्थ काढला तर तो योग्य ठरेल काय ? असा प्रश्न त्यांनी विचारला आहे. सर्व बाबतीत सरकारने व महावितरण कंपनीने पारदर्शक रित्या सर्व माहिती ग्राहकांना देणे व जाहीर घोषणेप्रमाणे टेंडर्स रद्द करण्याची कारवाई करणे आवश्यक असून फडणवीस यांनी त्वरित ती कारवाई करावी अशी मागणी होगाडे यांनी केली. खर्चाच्या योजनेस आयोगाची पुरवणी पूर्वपरवानगी बंधनकारक आहे.

उपाधीक्षक भूमिअभिलेख कार्यालयातील कारभाराच्या चौकशीसाठी समिती गठीत

धाराशिव दि.१५ (प्रतिनिधी) – परंडा येथील उपाध्यक्ष भूमि अभिलेख कार्यालयात झालेल्या मनमानी व गैरकारभाराची चौकशी करण्यासाठी त्रिसदस्य समिती गठीत करण्यात आली आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेना शहराध्यक्ष नवनाथ कसबे, माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ प्रचार प्रमुख राहुल शंकर बनसोडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून परंडा येथील उपाधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयातील भूमी अभिलेख विभागाचे उपाधीक्षक सुरेश कापसे, तत्कालीन भूमापक प्रशांत खरात, तत्कालीन सहाय्यक निमतनदार ए.ए. माने निमतनदार यांच्या चौकशीसाठी त्रिसदस्य समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीमध्ये धाराशिव येथील भूमी अभिलेख कार्यालयाचे सहाय्यक अधीक्षक संदीप आळसे यांच्या अध्यक्षतेखाली परिक्षण भूमापक लेख व नगर भूमापक रणजीत गुशिंगे, छाननी लिपिक (एकत्रिकरण) शशांक वचने यांचा समावेश आहे.

ही समिती धाराशिव जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांचे कार्यालयीन पत्र–२२२७ दि.०७/२०२४ रोजी नेमण्यात आली आहे. परंडा येथील उपाधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयामध्ये झालेली अनियमितता व प्रलंबितिताचा, त्याची कारणे व याबाबत टिप्पणीमध्ये स्पष्ट अभिपर्यायासह नोंद घ्यावी, उपाधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय परंडा यांची तपासणी करून तपासणी बाबत टिपणी पथक प्रमुखांनी तात्काळ जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय धाराशिव यांच्याकडे सादर करणे याची अंमलबजावणी तात्काळ करण्याबाबत आदेश दिले होते. कार्यालयाचा दर्जा व गुणवत्ता तात्काळ अहवाल सादर करण्याचे आदेश निकम साहेब जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय धाराशिव यांच्या आदेशानुसार परंडा येथील कार्यालयातील कामातील पडताळणी करणे, घोटाळ्याची चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. प्रशासनाकडे अहवाल सादर केला असून लवकरच पर्दाफाश होणार आहे. त्यामुळे अहवाल व कार्यवाहीकडे सर्व नागरिकांचे लक्ष वेधलेले असल्याचे नवनाथ कसबे यांनी सांगितले.

वडगाव (सि) येथील आश्रमात गुरुपौर्णिमा साजरी

धाराशिव दि.१५ (प्रतिनिधी) – तालुक्यातील वडगाव (सि) येथील श्री गुरुदेव महर्षी गज अरविंद व महर्षी अरविंद फाउंडेशन आश्रमात गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. यावेळी अर्चनाताई घोगरे, गज अरविंद, महर्षी अरविंद फाउंडेशन वडगाव शाखचे अध्यक्ष बाळासाहेब मुंदडा, सदस्य प्रवीण मुंडे, हरी क्षीरसागर, नित्यानंद स्वामी, रोहन मुंडे, रोहन सस्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कसबे यांनी केले.

भामट्याने बचत गटाच्या महिलांची साडेतेरा लाख रुपयांची केली फसवणूक

धाराशिव दि.१५ (प्रतिनिधी) – महिला बचत गटाच्या ८८ महिलांकडून बँकच्या कार्यालयात जमा करतो म्हणून स्वतःकडे ठेवून तब्बल १३ लाख ४९ हजार रुपयांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, धाराशिव तालुक्यातील गडदेवधरी येथील सुदर्शन बाबर हजारे यांनी दि.९ सप्टेंबर २०२३ ते २२ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत भारत फायनान्शियल इनक्लयुजन लि. इंडुसलॅन्ड बँक तुळजापूर यांच्याकडून बचत गटाच्या ८८ महिलांकडून तब्बल १३ लाख ४९ हजार ५०७ रुपये बॅकेच्या कार्यालयात जमा करतो म्हणून स्वतःकडे ठेवून घेवून कार्यालयात जमा न करता बॅकेची फसवणुक केली. या प्रकरणी मिथुन अंकुशराव राठोड (वय ३३ वर्षे), व्यवसाय खाजगी नोकरी, रा. गोवर्धन हिवरा जि. बीड ह.मु. हडको तुळजापूर यांनी दि.१३ जुलै रोजी दिलेल्या तक्रारीवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात भ.दं.वि.सं. कलम ४०६, ४२० अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

उद्धवराव पाटील म्हणजे तत्वनिष्ठ निस्पृह राजकारणी - लोमटे

धाराशिव दि.१५ (प्रतिनिधी) – शेतकरी, कष्टकरी व श्रमिकांसाठी जीवनभर लढणारे भाई उद्धवराव पाटील विरोधी पक्ष नेते होते. त्यांना मुख्यमंत्री पदाची संधी मिळाली असतानाही पक्ष निष्ठेने त्या पदाचा त्याग केला. त्यामुळे आजच्या दलबदलू राजकीय पुढाऱ्यांनी आदर्श घ्यावा असे तत्वनिष्ठ निस्पृह राजकारणी म्हणजे भाई उद्धवराव पाटील होते असे मत हभप पांडुरंग लोमटे महाराज यांनी व्यक्त केले.

झुंजार सेनानी भाई उद्धवराव पाटील यांच्या ४० वी पुण्यतिथी निमित्त छत्रपती शिवाजी हायस्कूल येथे शुक्रवारी सकाळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. प्रारंभी झुंजार सेनानी भाई उद्धवराव पाटील यांच्या पुतळ्यास उपस्थितांच्या हस्ते पुष्पांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजर्षी शाहू शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्षा शशिकलाताई घोगरे हे होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष नानासाहेब पाटील, महादेव गवाड, तेरणा साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष बाळासाहेब पाटील, महिला सबलीकरणाच्या सदस्य रेखा जगदाळे, संस्थेचे कार्याध्यक्ष एम.डी. देशमुख, उपाध्यक्ष ऍड. अविनाशराव देशमुख, सचिव भाई धनंजय पाटील, उषाताई देशमुख, रंगनाथ खोचरे, प्राचार्य पी.एन. पाटील, उपप्राचार्य एस.पी. मुंडे, पर्यवेक्षक व्ही. के. देशमुख, पर्यवेक्षक अमोल दिक्षित व मुख्याध्यापक कचरू घोडके आदी उपस्थित होते.

सामन्यांतील असामान्य व्यक्तिमत्त्व असलेल्या उद्धवराव दादांच्या संस्कारांनी आपल्या आयुष्याला कसे संस्कारित केले. हे त्यांच्यासोबतच्या अनेक प्रसंगाना उजाळा देत एम.डी. देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तर भाई उद्धवराव दादांनी सामाजिक, राजकीय काम करत असताना तळागाळातील लोकांसाठी आपले स्वतःचे संपूर्ण जीवन वाहून घेतले होते असे अध्यक्षिय मनोगतात शशिकलाताई घोगरे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य पाटील यांनी तर सूत्रसंचालन सुहासिनी जाधव व ज्योत्स्ना बनजगोळे यांनी व आभार पर्यवेक्षक अमोल दिक्षित यांनी मानले. या कार्यक्रमास नागरिक, पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पालकमंत्री सावंत यांनी दिलेला तो शब्द पाळला !

तेरणा कारखान्याने २ हजार ८८५ रुपये दिला सर्वाधिक दर

धाराशिव दि.१५ (प्रतिनिधी) – मराठवाड्यातील सर्वात जुना सहकारी साखर कारखाना म्हणून ओळख असलेल्या डोकी येथील तेरणा शेतकरी साखर कारखान्याचे भवितव्य अंधारात होते. मात्र हा कारखाना भैरवनाथ उद्योग समूहाने चालवण्यास घेऊन पहिला हंगाम पूर्ण केला आहे. हंगामाच्या उद्घाटना कार्यक्रमाप्रसंगी राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री तानाजीराव सावंत यांनी जिल्ह्यातील सर्व कारखान्यापेक्षा हा कारखाना ऊस घातलेल्या शेतकऱ्यांना किमान २५ रुपये तरी जास्त दर निश्चित देईन असा शब्द दिला होता. दिलेल्या आश्वासनानुसार त्यांनी या कारखान्यास ऊस घातलेल्या शेतकऱ्यांना २ हजार ८२५ रुपये दर देऊन दिलेला 'तो' शब्द त्यांनी पाळला आहे. विशेष म्हणजे जाहीर करण्यात आलेल्या या दराप्रमाणे ती रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात आलेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून पालकमंत्री सावंत चेअरमन शिवाजीराव सावंत संचालक धनाजी सावर कार्यकारी संचालक विक्रम सावंत यांच्यासह भैरवनाथ उद्योग समूहाचे शेतकरी आभार व्यक्त करीत आहेत.

तेरणा कारखाना भंगरात असल्यामुळे तो सुरू होईल किंवा नाही ? असा प्रश्न निर्माण झाला होता. भाडेतत्त्वावर विकत घेण्यासाठी देखील राजकारण घुसल्याने याचे भांडण थेट न्यायालयात गेले होते. मात्र उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मध्यस्थीने हा कारखाना भैरवनाथ उद्योग समूहाला देण्यासाठी त्यांनी यशस्वी प्रयत्न केले. त्यामुळे हा कारखाना पालकमंत्री सावंत यांच्या अधिपत्याखाली सुरू करण्यात आला आहे. या कारखान्याच्या पहिल्या गरीब हंगामाच्या प्रारंभी आयोजित केलेल्या कार्यक्रमात कारखान्याचे प्रमुख तथा पालकमंत्री सावंत यांनी जिल्ह्यामधील सर्वात जास्त जो कारखाना शेतकऱ्यांच्या उसाला दर देईल त्यापेक्षा किमान २५ रुपये पेरणा साखर कारखान्याच्या माध्यमातून दिला जाईल असे आश्वासन दिले होते. हा कारखाना चेअरमन शिवाजीराव सावंत कार्यकारी संचालक केशव सावंत उपाध्यक्ष अनिल सावंत कार्यकारी संचालक धनंजय सावंत यांच्या प्रयत्नातून यशस्वीरित्या चालविला जात आहे. भैरवनाथ शुगर वकर्स तेरणा कारखाना हे ६ वे युनिट असून पहिला हंगाम यशस्वीरित्या पूर्ण केला आहे. शेतकऱ्यांच्या उसाला सर्वाधिक दर दिल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. विशेष म्हणजे जाहीर केल्याप्रमाणे त्याची वचनपूर्ती केली असून शेतकऱ्यांचा आर्थिक फायदा झाला आहे.

धार्मिक क्षेत्र धरणांना व जाणिवांना समजून घेण्यासाठी महत्त्वाचे - डॉ. येवलेकर

धाराशिव दि.१५ (प्रतिनिधी) – मानवी विद्यांच्या (humanities) अभ्यास क्षेत्रातील जागतिक संशोधनात धार्मिक आस्थांच्या सर्वंकष अभ्यासास आज अतिशय महत्व आले आहे. तथापि धर्म निरपेक्षतेच्या अवाजवी प्रस्थामुळे हे महत्वाचे क्षेत्र भारतात मात्र दुर्लक्षिले जात आहे. हे क्षेत्र समाजाच्या धारणांना व त्यावर आधारित जाणिवांना समजून घेण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असल्याचे डॉ. मुग्धा येवलेकर यांनी सांगितले.

धाराशिव शहरातील व्यंकटेश महाजन महाविद्यालयामध्ये आयोजित रिसर्च इन ह्युमॅनिटीज ऍण्ड रिलीजीअस स्टडीज या विषयावर त्या बोलत होत्या. कॅलिफोर्निया स्टेट युनिव्हर्सिटी, फुलर्टन, अमेरिका येथील डिपार्टमेंट ऑफ रिलिजिअस स्टडीजमध्ये त्या सहयोगी अधिव्याख्याता आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्राचे संचालक डॉ. प्रशांत दीक्षित तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्था सचिव ऍड. मिलिंद पाटील, सदस्य शेषाद्री डांगे, कमलाकर पाटील, डॉ.अभय शहापुरकर, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.प्रशांत चौधरी, प्रा.रुपाली नारकर, नामदेव चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. येवलेकर यांनी मानव्य विद्या शाखेतील संशोधनाचे अनेक पैलू उलगडून दाखवले. तर रिलीजियस स्टडीजमध्ये त्यांनी पीएचडी कशा पद्धतीने केली ? हे उदाहरणासकट समजावून सांगितले. तसेच जागतिक स्तरावरील संशोधनात त्यावर व्यापक कार्य होत आहे. मात्र भारतात विद्यापीठीय पातळीवर हा अभ्यास विषयच अस्तित्वात नसल्याचे निरीक्षण त्यांनी नोंदविले. अनेक प्रश्नकर्त्यांनी धर्म आणि राजकारण, धर्म आणि रिलिजन, धर्म आणि विज्ञान यांच्याशी निगडित अनेक प्रश्न उपस्थित केले. त्यास समाधानकारक उत्तरे त्यांनी दिली. तर डॉ. दीक्षित यांनी सामाजिक शास्त्रांचा अभ्यास अधिक समाजाभिमुख झाला पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच भारतीय संस्कृतीमधील जीवनामूल्य जगाला दिशा देणारी आहेत अशी भूमिका शेषाद्री डांगे यांनी व्यक्त केली. यावेळी ऍड पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रा. शशिकांत देशमुख यांनी गीत सादर केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. मिलिंद माने यांनी तर आभार प्रा अशोक गोरे यांनी मानले. या कार्यक्रमास प्राध्यापक, कर्मचारी व नागरिक

संपादकीय

महात्मा फुले महाविद्यालयाची वारी समतेची, दिंडी वृक्षारोपणाची एक अभिनव उपक्रम..!

पंढरीची वारी आहे माझे घरी
आणिक न करी तीर्थव्रत

असे मोठे अभिमानाने संत तुकाराम महाराज सांगतात. ज्याने पंढरीची वारी केली त्याला अन्य कुठलेही व्रत करण्याची अथवा कुठल्या तीर्थालाही जाण्याची गरज नाही असे या अभंगात संत तुकोबांनी म्हटले आहे ते खोटे नाही.

_सुंदर ते ध्यान_ उभे विटेवर कर कटेवर_ ठेवोनिया ।

असा बळिया, पंढरीराव अर्थात विठोबा पंढरीमध्ये भक्तांची वाट पहात युगानुयुगे उभाच आहे. भक्तांसाठी ताटकळत थांबलेल्या अशा या विठुरायाच्या भेटीच्या ओढीने आषाढी एकादशीला दरवर्षी महाराष्ट्रातूनच नव्हे तर संपूर्ण देशभरातून वारकरी येत असतात.

वारी वारी जन्म मरणाचे दुःख_ वारी

असलेली वारी हजारो वर्षांपासून सुरू आहे. आषाढी जवळ आली की आपापल्या गावांतून लोक पंढरीच्या दिशेने निघतात. पंढरपूरच्या आजूबाजूचे सर्व रस्ते अक्षरशः माणसांनी फुलून येतात. आळंदीहून संत ज्ञानेश्वरांची तर देहूतून संत तुकोबांची पालखी निघते. या पालखी सोहळ्यात जवळपासच्या सर्व दिंड्या सहभागी होतात. जणू काही भक्तांचा समुद्रच पंढरपूरच्या दिशेने सरकताना दिसतो. हजारो वर्षांपासून सुरू असलेली पंढरीची वारी आज जागतिक वारसा म्हणून ओळखली जाते. या वारीचा सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध लेखक, समीक्षक तथा अहमदपूर जि. लातूर येथील महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या संकल्पनेतून वारी समतेची । दिंडी वृक्षारोपणाची ।। हा उपक्रम गेल्या काही वर्षांपासून सुरू झाला आहे. स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ परिक्षेत्रात महात्मा फुले महाविद्यालयाने एक आगळावेगळा ठसा उमटवला आहे. शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच सांस्कृतिक क्षेत्रातही सातत्याने उपक्रमशीलतेचा झेंडा फडकवून आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. यावर्षी देहू-आळंदीहून दिंड्यांचे प्रस्थान झाल्यानंतर महात्मा फुले महाविद्यालयात सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी कवी व समीक्षक प्रा . डॉ. मारा-ती कसाब व इंग्रजी विषयाचे तज्ज्ञ असलेले प्रा. डॉ. किरण गुट्टे यांच्या नेतृत्वाखाली एकमताने दिंडीचे आयोजन करण्याचे ठरले. प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांनी दिंडीसाठी किसान शिक्षण प्रसारक मंडळाची परवानगी काढली. दिंडीचे प्रस्थ-ान. ज्या दिवशी होते त्या दिवशी महाविद्यालयातील महिला प्राध्यापक भगिनींनी दिंडीतील वारकऱ्यांचे मऔक्षणफ करून शुभेच्छा दिल्या. त्यानंतर प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या हस्ते महाविद्यालय परिसरात पिंपळ वृक्षाचे रोपण करून दिंडीने पंढरपुराकडे प्रस्थान केली.

विठ्ठल... विठ्ठल..जय हरी विठ्ठल...! अशा सामूहिक गजरात, निनादात महात्मा फुले महाविद्यालयाची दिंडी समतेच्या वारीत सहभागी होण्यासाठी निघाली. शिरूर ताजबंद, चाकूर, आष्टा मोड मार्गे दिंडी लातूरात पोहोचली. तिथे दिंडीतील वारकऱ्यांना नागराज मुळे, अभिजीत मोरे आणि सतीश ससाणे यांच्या वतीने फराळ देण्यात आला. लातूरात वृक्षारोपण करून दिंडी पुढे मार्गस्थ झाली. तुळजापूरहून निघालेल्या तुळजापूरच्या शक्तीपीठ दिंडीमध्ये आमची वृक्षारोपणाची दिंडी सहभागी झाली. पायी चालत चालत असताना टाळ मृदुंगाच्या गजरामध्ये

_ज्ञानोबा माऊली.._तुकाराम..!

या जयघोषात सर्वांनी ठेका धरला होता. तुळजापूर-पंढरपूर या महामार्गावर तुळजापूर येथील शक्तिपीठ दिंडीचे महंत रामेश्वर स्वामी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. वाटेत सांगवी या गावी सर्व वारकऱ्यांबरोबर आमच्या दिंडीतील वारकऱ्यांनी गावकऱ्यांनी दिलेल्या भोजनाचा आस्वाद घेतला. त्यानंतर वृक्षारोपणाची दिंडी पुढे निघाली. याच महामार्गावरील पवनी तालुका मोहोळ येथील एका शेत आखाड्यावर शेतकरी चांगदेव सुर्वे आणि त्यांच्या पत्नी मालनबाई सुर्वे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. अशा प्रकारे ठीक ठिकाणी वृक्षारोपण करत संध्याकाळी महात्मा फुले महाविद्यालयाची वृक्षारोपण दिंडी श्री क्षेत्र पंढरपुरात दाखल झाली. रात्री उशिरा पंढरपुरातील श्री विठ्ठल रुक्माईंचे दर्शन घेऊन विठ्ठल रुक्मिणी मंदिर ट्रस्टच्या विठ्ठल रुक्मिणी भक्ती निवासात सर्वांनी मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी वृक्षदिंडी माळशिरसच्या दिशेने रवाना झाली. वेळापूरच्या मार्गावरून पुढे जात असताना महात्मा फुले महाविद्यालयातील इंग्रजी विभाग प्रमुख व दिंडीचे कुशलतेने नेतृत्व करणारे प्रा.डॉ.मारोती कसाब यांच्या बरोबरच प्रगल्भ जाणिवेचे, दुसरे कुशलतेने नेतृत्व करणारे प्रा. डॉ. किरण गुट्टे यांचे आई-वडील ह.भ.प. श्री. वामनराव व सौभाग्यवती गयाबाई गुट्टे हे दोघेही माऊलींच्या पालखी सोहळ्यात आळंदी पासून सहभागी झालेले वारकरी आम्हाला मोहोळ तालुक्यातील डेरला-वारला या गावी भेटले. यावेळी त्यांच्या हस्ते एका शेतवस्तीवर वेगवेगळ्या ठिकाणी अनेक वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर वेळापूर जवळ राजेंद्र माने व सूर्यकला माने या शेतकरी वारकरी दाम्पत्याच्या. तसेच ठाकूरबुवाची उघडेवाडी या ठिकाणी अनिल तात्या पवार व सुनीताताई पवार या शेतकरी वारकरी दाम्पत्याच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. माळशिरस ते वेळापूर या संपूर्ण मार्गावर वातावरण भक्तीमय झालेले होते. भगव्या पताका व माणसांनी रस्ते फुललेले होते. गजबजून गेले होते. सर्वांच्या मुखी संतांच्या भजनासह

ज्ञानोबा माऊली.._तुकाराम चा गजर होता. जयघोष होता .या मार्गावरून चालण्याचा आणि वृक्षारोपण करण्याचा बहुमान महात्मा फुले महाविद्यालयाच्या वृक्षारोपण दिंडीला मिळाला. रस्त्यात प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या हस्ते दिंडीतील वारकऱ्यांना चहापान देण्यात आले. दिंडीतील चित्रकथी, डोंबारी, वासुदेव आदी लोक कलावंतांच्या सहवासाने अधिकच रंगत चढली. माऊलींचा रथ आणि रथापुढे धावणारा अश्व पाहून सर्वांचेच मन समाधान झाले. अलौकिक आनंदाची प्रत्यक्ष अनुभूती येत होती. चेह-यावर समाधान झळकत होते. परतीच्या मार्गावर पुन्हा जागोजागी वृक्षारोपण करत ही दिंडी अहमदपूर मुक्कामी पोहोचली. मजल.. दरमजल करीत...आणि वृक्षांचे संवर्धन , पर्यावरण प्रबोधन करीत... समतेचा संदेश देत निघालेली मवारी समतेची... दिंडी वृक्षारोपणाचीफ या उपक्रमाचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. मारोती कसाब आणि डॉ. किरण गुट्टे यांनी सक्षमपणे , समर्थपणे नेतृत्व केले. त्यांना आयक्यूएसीचे समन्वयक व उपप्राचार्य डॉ.डी.डी.चौधरी, नॅक कॉर्डिनेटर डॉ. प्रशांत बिरादार, तसेच प्रो. डॉ.एन.यु.मुळे, प्रा. डॉ. पी. पी. चौकटे ,रूट प्रमुख प्रा . डॉ. डी. एन.माने , व्हीडिओ शुटिंग, प्रतिमा टिपणारे ग्रंथपाल प्रा.परमेश्वर इंगळे ,अजय मुरमुरे तसेच चंद्रकांत शिंपी यांच्यासह महाविद्यालयातील सर्व मान्यवरांनी दिंडी यशस्वी केली. सर्वांनीच दिंडीतून समतेचा व पर्यावरणाचा संदेश देऊन त्याचे रक्षण करण्यासाठी प्रेरीत केले. सदर दिंडीत महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी सहभागी झाले होते. वारी समतेची दिंडी वृक्षारोपणाची या उपक्रमाचे किसान शिक्षण प्रस-ारक मंडळाचे अध्यक्ष श्रीरंगराव पाटील एकंबेकर, सचिव पी.टी. शिंदे, यांच्यासह कार्यकारी मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी व परिसरातील मान्यवरांनी कौतुक केले.

पावसाळ्यात मुंबई का कोलमडते?

गेल्या पन्नास वर्षांत बहुतेक काळ देशात सर्वात श्रीमंत असलेल्या मुंबई महापालिकेवर अगोदर काँग्रेस आणि नंतर अविभाजित शिवसेना-भाजपाची सत्ता होती. याच काळात राज्यात सुरुवातीला काँग्रेस नंतर काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस (आघाडी) अविभाजित शिवसेना - काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस (महाविकास आघाडी), आता एकनाथ शिंदे यांची शिवसेना, अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपाची (महायुती) सत्ता आहे. गेल्या पाच दशकांत महापालिका व राज्यात सत्तांतराचे अनेक खेळही झाले. डझनभर महापौर आले व गेले, तेवढेच मुख्यमंत्री सत्तेवर आले. कारभारी बदलले व नवीन आले पण देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई महानगराची काळजी सत्ताधाऱ्यांनी पुरेशी घेतली नाही हे खेदाने म्हणावे लागेल. राजकारण व सत्ताकारण चालूच राहणार. सत्ताधारी व विरोधी पक्ष बदलत राहणार पण मुंबई महानगराच्या समस्यांकडे पुरेसे लक्ष दिले जाणार नसेल, तर राज्यालाच नव्हे तर त्याची किमत देशाला मोजावी लागेल

मुंबई महानगराची लोकसंख्या दीड कोटींच्या घरात आहे. सर्व देशांतून रोजगारासाठी आलेले लोक या महानगरात राहत आहेत. मध्य, पश्चिम व हार्बर मार्गावरील खचाखच भरलेल्या लोकल्स ट्रेनच्या गर्दीतून जीव मुठीत धरून मुंबईकर रोज प्रवास करीत असतात. पंचाहत्तर लाख मुंबईकरांची रोजी-रोटी, मुंबईची जीवनवाहिनी ओळखल्या जाणाऱ्या उपनगरी रेल्वे सेवेवर अवलंबून आहे. ही उपनगरी रेल्वे सेवा खंडित झाली, तर मुंबईत किती हाहाकार उडतो, याची प्रचिती पुन्हा एकदा गेल्या सोमवारी ८ जुलै रोजी आली. रात्री ६ तास कोसळलेल्या मुसळधार पावसाने मुंबई बंद केली. केवळ तीनशे मिमी झालेल्या पावसाने मुंबईची लोकल सेवा ठप्प झाली. रेल्वे मार्गावर व सर्व प्रमुख रस्त्यांवर तसेच लहान-सहान गल्ल्यांमध्ये नि अरुंद रस्त्यांवर पाणीच पाणी साचले. सहा तासांच्या पावसाने मुंबईची तुंबई झाली आणि देशाच्या आर्थिक राजधानीतील दैनंदिन जीवनाची चक्रे बंद पडली.

या देशात मुंबई हे एकच महानगर असे आहे की, ते चोवीस तास चालू असते. रेल्वे रात्री एक-दीडपर्यंत, तर बस, रिक्षा, टॅक्सी आदी वाहने रात्री उशिरापर्यंत कुठेही उपलब्ध असतात. मुंबई हे जसे श्रीमंत व गर्भश्रीमंतांचे शहर आहे, बॉलिवुडचे ग्लॅमर या शहराला आहे तसेच देशाच्या अर्थव्यवस्थेचे चलनवलन याच महानगरातून होत असते. देशाला सर्वाधिक महसूल याच मुंबई महानगरातून दिला जातो. मग तीनशे मिमी. पावसाने मुंबईची चाके बंद कशी पडू शकतात? त्याला जबाबदार कोण? एक दिवस मुंबई बंद म्हणजे हजार-दीड हजार कोटींचे नुकसान होते, मग दरवर्षी पावसाळ्यात मुंबईत एकदा-दोनदा ठप्प होते, जनजीवन पूर्ण विस्कळीत होते, उपनगरी रेल्वेसेवा मान टाकते, या मुंबईकरांच्या वेदना कधी थांबणार? दरवर्षी पावसाळ्यात मुसळधार पावसाने मुंबईत अनेक रस्त्यांवर व सब-वेमध्ये पाणी तुंबते. वाहतूक बंद होते, ८ जुलैला तर अनेक रस्त्यांवर अंधेरी, मरोळ, कुर्ला, घाटकोपर, भांडुप, कांजूरमार्ग तसेच लालबाग, परळ, शीव, माटुंगा अशी डझनावरी ठिकाणे तीन ते चार फूट पाण्याखाली होती. मुंबईतील झोपडपट्ट्यांमध्ये घराघरांत पाणी शिरले होते. जिथे मेट्रोची, पुलांची व रस्त्यांची कामे चालू आहेत, जिथे निळे पत्रे ला-वून मोठं मोठे उतुंग टॉवर्स उभारण्याचे काम चालू आहे, तिथे रस्त्यावर मुसळधार पावसाने तलाव निर्माण झाले होते. पाण्याचा निचरा होण्यास मार्ग नसेल, तर पाणी वाहून जाणार तरी कुठे? महापालिका व राज्य सरकारमधील कारभारी बदलले तरी कर्मचारी, अधिकारी तेच असतात. दरवर्षी पावसाळ्यात पाणी का तुंबते, मुंबईची तुंबई का होते, याचे कारण त्यांना पक्के ठाऊक असते. यावर्षी मुंबईत नालेसफाई ११० टक्के झाल्याचा दावा करण्यात आला होता. स्वत: मुख्यमंत्री व सत्ताधारी पक्षांच्या नेत्यांनी नालेसफाईची प्रत्यक्ष पाहणी केली होती. मग एका पावसातच मुंबई का पाण्याने वेढली गेली? सोमवारी विधिमंडळाचे अधिवेशन होते. बाहेरगावाहून येणारे काही मंत्री व आमदारही रेल्वे गाडीत अडकले होते, कोणी रेल्वेतून खाली उतरून रेल्वे मार्गावरून चालत होते, तर कोणी रेल्वेच्या दरवाजात उभे राहून गाडी कधी सुरू होणार याची वाट बघत होते. आमदार व मंत्री अडकले म्हणून त्यांना टीव्हीची प्रसिद्धी मिळाली, पण लक्षावधी मुंबईकर दरवर्षी पावसाळ्यात या यातना भोगतात, त्यावर विधिमंडळात कधी चर्चा होत नाही. महापालिका, रेल्वे, बेस्ट प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना तसेच मुंबई पोलिसांना पावसाळ्यापूर्वी एकत्रित चर्चेला बोलावून मुंबईची तुंबई होऊ नये म्हणून काय काय उपाययोजना केली आहे व करायला हवी, यावर दरवर्षी चर्चा होत नाही. राज्य सरकार व महापालिका, रेल्वे, बेस्ट, मुंबई पोलीस यांच्यात समन्वय असणे सर्वात महत्त्वाचे आहे.

बॅ. ए. आर. अंतुले मुख्यमंत्री असताना त्यांच्या पत्नी नर्गिस या पुण्याला जाताना खंडाळा घाटात वाहतूक कोंडीत अडकल्या होत्या. त्याच सुमारास तत्कालीन ऊर्जामंत्री जयंतराव टिळक हे पुण्याहून मुंबईला येताना खंडाळा घाटात अनेक तास अडकले होते. स्वत: अंतुले यांनी खंडाळा घाटातील वाहतूक कोंडीची दखल घेतली व तातडीने घाटात पर्यायी मार्ग उभारण्याचा निर्णय घेतला. दरवर्षी पावसाळ्यात मुंबईची तुंबई होते व आर्थिक राजधानीचे जनजीवन ठप्प होते, हा मोठा अपराध आहे असे कुणाला वाटत नाही का? मुंबईचे जनजीवन एक मिनीटही खंडित होता कामा नये, यासाठी राज्यकर्ते ठोस उपाय का शोधत नाहीत? मुसळधार पाऊस असताना समुद्राला भरती सुरू झाली की, मुंबईत पाणी तुंबते, हेच कारण वर्षानुवर्षे ऐकायला मिळत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात यापुढेही दरवर्षी पावसाळ्यात मुंबई तुंबतच राहणार का? दिल्ली, चेन्नई, पाटणा, गुवाहटी अगदी युरोप, अमेरिकेतील शहरांनाही अतिवृष्टीचा फटका बसल्यावर तेथील जनजीवन विस्कळीत होते, पण दरवर्षी नित्यनियमाने पावसाळ्यात ही शहरे नेहमी हमखास पाण्याखाली असतात असे दृश्य दिसत नाही. समुद्राकाठी शहर आहे म्हणून पावसाळ्यात पाणी तुंबणारच, असेच सर्व जगात घडत असते का? पावसाळ्यात रुळावर पाणी साचले किंवा सिग्नल यंत्रणा बिघडली म्हणून लोकल्स एकापाठोपाठ उभ्या राहिलेल्या दिसतात, लोकल का थांबली याचे कारण फलाटावर प्रतीक्षा करणाऱ्या व डब्यात अडकून राहिलेल्या प्रवाशांना सांगण्याची व्यवस्था रेल्वेकडे नाही का?मुंबईची तुंबई होण्यास भ्रष्टाचाराचा मार्ग अवलंबिणारे नोकदार, त्यांच्याशी हातमिळवणी करणारे कंत्राटदार आणि टेंडर घुसवणारे हितसंबंधी हे जास्त जबाबदार आहेत तसेच अस्वच्छ वागणारे व रस्त्यावर कचरा-घाण टाकणारे लोकही तेवढेच जबाबदार आहेत. रस्त्यावर थुंकणारे, तंबाखूच्या पिचकाऱ्या मारणारे, मावा-गुटख्याची पाकिटे फेकणारे, वेफर्स किंवा अन्य खाद्य पदार्थांच्या प्लास्टिकच्या पिशव्या रस्त्यावर टाकून देणारे, रेल्वे रुळावर चुळा भरणारे, कागदाच्या पुरचुंड्या, कापडी बोळे, बिसलरीच्या बाटल्या रेल्वे

मार्गावर भिरकावणारे हे काय आदर्श नागरिक आहेत काय? यांना महापालिका व रेल्वेच्या सुरक्षा रक्षकांकडून वेळीच दंडीत केले पाहिजे. मुंबईची तुंबई करण्यास नोकरदार - कंत्राटदार यांची भ्रष्टाचारी साखळी जबाबदार आहे, तेवढेच रस्त्यावर व रेल्वे मार्गावर कचरा व घाण टाकणारे बेजबाबदार हजारो लोकही तेवढेच दोषी आहेत. पावसाळ्यापूर्वी नालेसफाई १०० टक्के का होत नाही? रस्त्यावरील कचऱ्याचे ढीग १०० टक्के उचलून रस्ते स्वच्छ का होत नाहीत? रेल्वे स्थानकाच्या परिसरात दोन्ही बाजूला रस्ते अडवून ठाण मांडून बसलेले फेरीवाल्यांचे जथे कायमचे का हटवले जात नाहीत? अतिक्रमणमुक्त पदपथ व तुंबईमुक्त मुंबई ही जबाबदारी कोणाची आहे ?पावसामुळे मुंबई कोलमडून पडली की मुंबईची अर्थव्यवस्था अस्ताव्यस्त होते. मुंबईचे जीवन कोलमडून पडते. हे काय देशाच्या आर्थिक व महाराष्ट्राच्या राजधानीला भूषणावह आहे का? यापूर्वीच्या अनेक मुख्यमंत्र्यांनी मुंबईचे सिंगापूर करणार, हाँगकाँग करणार अशा घोषणा केल्या होत्या. आताचे सत्ताधारी तशा घोषणा करीत नाहीत, पण मुंबईचे दैनंदिन जीवन सुखकर होईल यासाठीही सरकारकडे ठोस आराखडा किंवा नियोजन नाही. मुंबई महानगरासाठी राज्य व केंद्र सरकार तसेच मुंबईसाठी विविध सेवा देणाऱ्या यंत्रणांमध्ये समन्वय साधणारे स्वतंत्र मंत्रालय निर्माण करणे ही काळाची गरज आहे.-

स्टेटलाइन: डॉ. सुकृत खांडेकर

झाडे लावा, जीवन वाचवा

उन्हाळ्यात आपणा सर्वांना ४५ डिग्रीपेक्षा जास्त तापमानाला सामोरे जाण्याची वेळ आली होती. त्यावेळी आपली मानसिक अवस्था काय झाली होती याचा प्रत्येकांनी विचार करावा. याचे एकमेव कारण होते ते म्हणजे औद्योगिकीकरणाच्या नावाखाली झाडांची होणारी कत्तल. त्याचबरोबर नवीन झाडे लावली पाहिजेत. घोषणा होतात, मात्र नंतर त्या घोषणांचे काय होते हे देशातील सर्वसाधारण जनतेला माहिती असते. तेव्हा आता जनतेनेच अशा गोष्टींमध्ये सतर्क राहाणे गरजेचे आहे. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी झाडे महत्त्वपूर्ण भूमिका बजावीत असतात याची जनजागृती करावी लागेल. त्यासाठी आला पावसाळा, चला झाडे लावूया' अशा घोषणांनी लोकांना झाडे लावण्याची जाणीव करून दिली पाहिजे. तेव्हा आपले सर्वांचे जीवन वाचविण्यासाठी चला तर पावसाळा सुरू झाला. सर्वांना संजीवनी मिळण्यासाठी झाडे लावूया तरच आपले जीवन वाचवू शकतो. हिरव्यागार झाडांमुळे जणू सृष्टीने हिरवा शालू नेसला असे आपणा सर्वांना वाटत असते. तेव्हा कोकणात आल्यावर असे शालू पाहायला मिळतात. त्यामुळे मनाचे खूप समाधान होते. कारण आपण निसर्गाच्या सान्निध्यात आल्याची आपल्याला जाणीव होते. मात्र आजची परिस्थिती वेगळी आहे. विकासाच्या नाव-खाली वृक्षतोड होते. त्या प्रमाणात वृक्षारोपण होत नाही. त्यामुळे आज झाडे लावा, जीवन वाचवा' असे म्हणण्याची वेळ आली आहे. तसेच मन की बात' या कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सुद्धा देशातील जनतेला आवाहन केले की, आपल्या आईच्या नावाने एक झाड लावावे याची पण सर्वांना माहिती आहे. देशात विकासाच्या नावाखाली झाडे तोडली जातात. मात्र त्या प्रमाणात झाडांची लागवड केली जात नाही. तेव्हा निसर्गाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येक वर्षी पावसाळ्यात झाडे लावण्यासाठी जनजागृती करून झाडे लावली पाहिजेत. त्याचप्रमाणे झाडांचे संगोपन केले पाहिजे तरच आपले जीवन वाचवू शकतो. तेव्हा आजच्या घडीला झाडे लावणे गरजेचे झाले आहे. एक वेळ आपल्या परिसरातील डोंगर झाडांच्या हिरव्यागार पानांनी सजलेले दिसत होते. आज त्या ठिकाणी सिमेंटची जंगले उभी असताना दिसतात. याचा परिणाम दिवसेंदिवस जंगलतोड होत असल्यामुळे पावसाचे प्रमाण कमी होऊ लागले आहे. तेव्हा सुजाण नागरिकांनी उंच इमारतीत राहाणे पसंत जरी केले तरी किमान एक व्यक्ती एक झाड दर वर्षी लावणे स्वत:च्या तसेच देशाच्या हितासाठी गरजेचे आहे. म्हणजे दर वर्षी देशात १०० कोटीपेक्षा जास्त झाडे लावू शकतो. हा महत्त्वाचा संकल्प सन २०२४ पासून आपल्या देशातील प्रत्येक नागरिकांनी केला पाहिजे. केवळ झाडे लावा झाडे जगवा' अशी घोषणा करून चालण-ार नाही तर प्रत्यक्षपणे कृती करणे गरजेचे आहे. जेव्हा शासकीय अनुद-ानातून वृक्षारोपण करीत असतो तेव्हा अनुदान फुकट जाणार नाही याची काळजी वनविभागाला घ्यावी लागेल. त्यासाठी प्रथम जमिनीचे क्षेत्र निवडावे लागेल. उन्हाळ्यात दोन ते तीन वर्षे झाडांना पाणी घालण्यासाठी जवळपास नदी-नाले असणे आवश्यक आहे. वाडीत व गाव-तील मोकळ्या जागेत तसेच रस्त्यांच्या दोन्ही बाजूला झाडांची लागवड करण्यात यावी तसे अगोदर मोकळ्या जागेचे सर्वेक्षण शासनाच्या वतीने करण्यात यावे. म्हणजे पावसाळ्यात झाडे लावणे सोयीचे होईल.सध्या पावसाळा सुरू झाला असला तरी कडक उन्हाळ्यामध्ये प्रत्येकाला झाडांची आठवण आली असेल. तेव्हा गाजावाजा न करता किमान एक व्यक्ती, एक झाड' या तत्त्वाचा अवलंब करून या वर्षीपासून झाडे लावूया. त्यासाठी देशातील प्रत्येक व्यक्तीने डोळ्यांसमोर ध्येय्य ठेवूया. यातच आपले सर्वांचे कल्याण आहे. दरवर्षी झाडे लावा, झाडे जगवाचा नारा देतो. मात्र यातील किती झाडे जगवतो याचा प्रामाणिकपणे विचार होणे आवश्यक आहे. पाहा ना देवेंद्र फडणवीस सरकारच्या काळात राज्यात ३३ कोटी झाडे लावण्याचा निर्धार केला होता. त्यासाठी रुपये एक हजार कोटी खर्च करण्यात आले. याची सुरुवात १ जुलै, २०१९ रोजी चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यातील आनंदवनमध्ये वनमहोत्सव साजरा करून १ जुलै, २०१९ ते ३० सप्टेंबर, २०१९ या तीन महिन्यांत झाडे लावण्याचा संकल्प करण्यात आला होता. त्यावेळी एकच लक्ष, लावू ३३ कोटी वृक्ष' अशा गर्जना सुद्धा झाल्या. आता यातील किती झाडे जगली आहेत याचा वनमहोत्सव साजरा करणाऱ्या वनविभागाने घोषित करणे आवश्यक आहे. कारण ही झाडे लावण्यासाठी राज्यातील प्रत्येक नागरिकाचा आर्थिक सहभाग आहे. याची जाणीव राज्यातील प्रत्येक नागरिकांना झाली पाहिजे. तरच शासकीय अनुदानाचा योग्य प्रकारे वापर होईल.राज्यात औद्योगिकीकरणाच्या ना-वाखाली मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल करण्यात येत आहे. मात्र त्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात येत नाही. झाडे ला-वली जातात ती सुद्धा कार्यक्रमापुरते त्यामुळे उन्हाळ्यात उष्णतेचा पारा चढू लागला आहे. अंगाची लाहीलाही होत आहे. याचा पण विचार देशातील नागरिकांनी करणे गरजेचे आहे. देशाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून औद्योगिक बदल घडणे गरजेचे असते. याचा अर्थ असा नव्हे की, झाडांचा नायनाट करणे. तेव्हा दरवर्षी प्रत्येकांनी न विसरता आपल्या परिसरात पावसाळ्यात झाड लावलेच पाहिजे असा संकल्प करुया.-रवींद्र तांबे

नशिबात असेल तेच मिळेल

एका गावात सोमिलक नावाचा कष्टाळू कोष्टी होता. तो तलम कापड विणण्यात पटाईत होता. पण कष्ट भरपूर करूनसुद्धा अपेक्षित मोबदला त्याच्या हाती येत नव्हता. त्याच्या बरोबरचे इतर कोष्टी जाडभरडं कापड विणूनसुद्धा भरपूर पैसा कमवित होते.सोमिलकाने दुसऱ्या गावी जाऊन धंदा करण्याचे ठरविले. पण सोमिलकाची बायको त्याला म्हणाली, ''कशाला उगाच दुसऱ्या गा-वात जाता.... आपल्या नशिबात भरपूर पैसा मिळणार असेल तर याच ठिकाणी कापड विणून मिळेल. पण नशिबात जर नसेल तर दुसऱ्या गावी जाऊनही उपयोग काय?'' तरी हट्टाने सोमिलक दुसऱ्या गावी जातो. भरपूर कष्ट करतो आणि तिनशे मोहरा कमावतो.त्या मोहरा घेऊन आपल्या गावी येण्यास निघतो. दम ल्यामुळे एका झाडाखाली विश्रांती घेता घेता त्याला झोप लागते. थोड्यावेळाने दोन माणसांच्या संभाषणाच्या आव-ाजामुळे झोप उडते. त्या दोघांचे संभाषण सोमिलक ऐकतो.''अरे, कर्त्या... सोमि लकाने आता तीनशे मोहरा कमावल्या पण त्याच्या नशिबात फक्त अन्नवस्त्रा-पुरताच पैसा आहे'' कर्म विचारतो. त्याबरोबर कर्ता उद्गारतो, ''त्याने कष्ट केले त्याचे फळ मी दिले. ते फळ त्याच्याकडे ठेवायचे की नाही हे तुझं काम!''दे घोघेजण सोमिलकाचे कर्म आणि कर्ता असतात. सोमिलक पूर्ण जागा होऊन आपली मोहरांची पिशवी बघतो तर ती रिकामी असमे!

राशी भविष्य

१६ जुलै २०२४ (पीएसआय)

मेष : शुभ रंग:पिवळा: शुभ दिशा:पश्चिम
वेळेत कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. मित्रांचे व सगे सोयऱ्यांचे सहकार्य मिळेल. निष्कारण वाद विवाद, तणाव टाळला पाहिजे. व्यापाराती योग्य निर्णय फायदेशीर राहील.

वृषभ : शुभ रंग:निळा, शुभ दिशा: पूर्व
आपली दयाळू प्रवृत्ती, उदारतेमुळे आपल्याला एक नवीन सुख देऊन जाईल. नवीन पद मिळण्याची शक्यता आहे. गुंतवणूकीच्या बाबतीत जागृत रहा. मुलांचे जीवन समाधानी राहील.

मिथुन : शुभ रंग: काळा, शुभ दिशा: पश्चिम
जीवनसाथीच्या प्रकृतीची चिंता जाणवेल. खर्च वाढल्याने आर्थिक टंचाई भासणार आहे. व्यापारा व्यवसाय सामान्य राहील. वादविवादापासून दूर रहा.

कर्क : शुभ रंग:गुलाबी,शुभ दिशा:पूर्व
व्यक्तिगत कामात प्रगती राहील. आर्थिक परिस्थिती सुधारणार आहे. समाजात आपले कौतुक होईल. व्यापार फायदेशीर राहील. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

सिंह : शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा:उत्तर
नम्रपणा सोडू नका. वयस्कर लोकांचा सन्मान व आदर ठेवा. व्यापारीक निर्णय वेळेत घेतल्याने फायदा होईल. कौटुंबिक समस्या दूर होतील.

कन्या : शुभ रंग:लाल, शुभ दिशा:उत्तर
जीवनसाथीचे सहकार्य आपल्याला मिळेल. आर्थिक स्थिती चांगली राहील. प्रतिष्ठीत लोकांच्या भेटीमुळे आपल्या फायद्यात वाढ होईल. प्रवासात सावधानी बाळगा.

तुळ: शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा: पूर्व
व्यापार चांगला चालेल. संपत्ती बाबत आकांक्षा पूर्ण होतील. कामामध्ये यश मिळविण्यासाठी प्रयत्नशील रहा. कौटुंबिक किंवा घराची समस्या भेडसावेल.

वृश्चिक: शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पूर्व
जास्त धावपळ केल्याने थकवा जाणवेल. आपल्या अपक्षेप्रमाणे कामे होणार नाहीत. व्यवसायात फायदा मिळण्याची शक्यता कमी. आत्मविश्वास बाळगा.

धनु: शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व
जोखमीचे व जबाबदारीचे कामे सावधतेने करा. निष्कारण धावपळ करू नका. प्रयत्न करून आज यश कमी मि ळेल. कौटुंबिक समस्यांची चिंता राहील.

मकर : शुभ रंग:भूरकट, शुभ दिशा:उत्तर
प्रतिष्ठीत व्यक्तींच्या संपर्कामुळे फायदा होईल. आपल्या आर्थिक परिस्थिी सुधारेल. कामे टाळण्याचा प्रयत्न करू नका. व्यापारातील नवीन योजना फायदेशीर राहतील.

कुंभ: शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:उत्तर
कौटुंबिक संबंध मधूर राहतील. मान सन्मान वाढेल. भागीदारीचे अनेक नवीन प्रस्ताव मिळतील. अनोळखी व्यक्तीपासून सावध रहा. अडकलेला पैसा मिळेल.

मीन : शुभ रंग:निळा, शुभ दिशा:पूर्व
अति उत्साह आपल्याला नुकसान पोहचवेल. प्रवासाचा फायदा होणार नाही. अधिक खर्च करण्याची प्रवृत्ती सोडा. व्यापार मध्यम राहील.

१६ जुलैला जन्मलेल्या लोकांचा भविष्य
स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर सुर्य, शुक्र व नेपच्यूनचा प्रभाव आहे. कुठलेही काम तुम्ही प्रचंड उत्साहाने सुरू करता. पण छोटेसे अपयश आल्यास तुमचा उत्साह मंदाव-तो. नैराश्याच्या भरात तुम्ही ते अर्धवट सोडून देता. तुमच्याकडे असाधारण प्रतिभाशक्ती आहे. संगीत, नाट्य, चित्रपट इ. कलात तुम्ही सहज प्रावीण्य मिळवू शकता व त्यात निर्मितीही करू शकता. तुमचे बरेचसे निर्णय साधकबाधक विचारांच्या ऐवजी अंत:स्फूर्तीने होतात. जीवनातील गूढ, अतार्किक गोष्टीचा उलगडा करण्यासाठी प्रयत्न करता.

अपयशामुळे औदासीन्य आल्यास निसर्गाच्या सहवासात किंवा जलाशयाच्या काठी जाऊन आत्मपरीक्षण करा. परिस्थितीला अपेक्षित वळण देण्यासाठी प्रयत्न करा. नैराश्य व उदासीनतेमुळे व्यसनाकडे प्रवृत्ती होऊ शकेल. मादक द्र

अंबानींच्या लग्नात फक्त दोन मराठी सिनेकलाकारांना निमंत्रण,

पण त्यांनीही फिरवली पाठ?

मुंबई-मुंबईत पार पडलेल्या राजेशाही सोहळ्याला संपूर्ण बॉलीवूड अगदी झाडून उपस्थित होते. म्हणजे अगदी ऑरीपासून ते रजनीकांत, अमिताभ या दिग्गज मंडळींनी देखील अंबानींच्या सोहळ्याला उपस्थिती लावली. इकतच नव्हे तर मराठमोळ्या गायकांच्या तालावर वऱ्हाडी मंडळी थिरकलीही. पण यामध्ये मराठी सिनेसृष्टीतले कलाकार मात्र कुठेही दिसले नाहीत.

अंबानींच्या लग्नासाठी मराठी सिनेसृष्टीतील दोन कलाकारांना निमंत्रित करण्यात आले होते. त्यामध्ये अमृता खानविलकर आणि अभिनेता श्रेयस राजे यांचा समावेश होता. पण दोन्ही कलाकार मंडळी या गर्दीत कुठेच दिसली नाहीत. त्यामुळे ही मंडळी उपस्थितच नव्हती की पापाराझीच्या कॅमेऱ्यात टिपलीच गेली नाहीत, असा प्रश्न नेटकऱ्यांना पडला आहे.

अमृता आणि श्रेयस गैरहजर?

श्रेयस आणि अमृता या दोघांनीही त्यांच्या सोशल मीडियावर अंबानींकडून आलेल्या निमंत्रण पत्रिकेचे फोटो शेअर केले होते. श्रेयसने हे फोटो शेअर करत अगदी आता लग्नाला जावे लागेल असे कॅप्शन दिले होते. तसेच अमृताने तिला आलेल्या निमंत्रण पत्रिकेचे फोटो शेअर केले होते. पण समोर आलेल्या कोणत्याही व्हिडीओ आणि फोटोमध्ये श्रेयस अमृता दिसले नाहीत. त्याचप्रमाणे त्यांनी देखील त्यांच्या सोशल मीडियावर सोहळ्याचे कोणतेही फोटो टाकले नाहीत.

सोशल मीडियावर चर्चांना उधाण

दरम्यान सोशल मीडियावर मराठी कलाकारांना निमंत्रण न मिळाल्याने अनेकांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. एकाने एक्स पोस्ट करत म्हटले की,शाही विवाह सोहळ्यात मराठी कलाकारांना निमंत्रण असूनही त्याने पाठ फिरवली किंवा ते प्याप्सच्या कॅमरातून कसे सुटले हा प्रश्न नक्की पडतोष्ठ त्यामुळे नक्की काय घडलेय, या प्रश्नाचे उत्तर सध्या अनेकजण शोधत आहेत.

अंबानींच्या सोहळ्याला मराठमोळा साज

अनंत अंबानी आणि राधिका मर्चंट यांचा लग्नसोहळा १२ जुलै रोजी पार पडला. या सोहळ्याला पंतप्रधान मोदींपासून अनेक दिग्गजांनी उपस्थिती लावली होती. पण या लग्नातील मराठमोळ्या साजने विशेष लक्ष वेधून घेतले. गायक अजय-अतुल यांच्या गाण्याने अनंतचा लग्नमंडप दुमदुमला. त्याचप्रमाणे संजू राठोडच्या गुलाबी साडी गाण्यावरही वऱ्हाडी मंडळी थिरकताना पाहायला मिळाली.

हिरामंडी फेम अभिनेत्री लवकरच होणार आई, होणाऱ्या बाळासाठी शेअर केली खास पोस्ट

मुंबई-हिरामंडी फेम अभिनेत्री रिचा चड्ढा बॉलिवूडमधील उत्तम अभिनेत्रींपैकी एक आहे. अभिनेत्री रिचा चड्ढाने तिच्या अभिनयाच्या जोरावर चाहत्यांच्या मनात वेगळं स्थान निर्माण केलं आहे. अलिकडेच रिचा चड्ढा 'हिरामंडी'मध्ये लज्जोच्या भूमिकेत झळकली होती. लज्जो असो किंवा 'फुकरे' चित्रपटातील भोली पंजाबन, रिचाने प्रत्येक भूमिकेवर आपली छाप पाडली आहे.

'हिरामंडी' फेम अभिनेत्री लवकरच होणार आई

रिचा चड्ढा तिच्या प्रोफेशनल लाईफसोबतच पर्सनल लाईफमुळेही चांगलीच चर्चेत असते. रिचा लवकरच आई होणार असून सध्या प्रेग्नंसीच्या काळातील अनुभव चाहत्यांसोबत सोशल मीडियावर शेअर करत असते. नुकतीच रिचाने सोशल मीडियावर एक पोस्ट केली आहे. होणाऱ्या बाळासंदर्भात रिचाने केलेल्या या पोस्टने सर्वांचं लक्ष वेधलं आहे. अभिनेत्री रिचा चड्ढाने पोस्ट करत कळी फुलण्याची वाट पाहत असल्याचं म्हटलं आहे.

होणाऱ्या बाळासाठी शेअर केली खास पोस्ट

अभिनेत्री रिचा चड्ढा सध्या प्रेग्नंट आहे. रिचा सध्या गर्भधारणेच्या टप्प्याचा आनंद घेत आहे. लवकरच रिचा तिच्या पहिल्या बाळाला जन्म देणार आहे. आता नुकतीच तिने सोशल मीडियावर फोटो शेअर करत एक पोस्ट केली आहेत. या पोस्टमध्ये ती होणाऱ्या बाळासाठी खास संदेश लिहिला आहे.

हिरामंडी' फेम अभिनेत्री लवकरच होणार आई, होणाऱ्या बाळासाठी शेअर केली खास पोस्ट

रिचा गरोदरपणाच्या शेवटच्या टप्प्यात

अभिनेत्री रिचा चड्ढा सध्या तिच्या प्रेग्नंसीच्या शेवटच्या टप्प्यात आहे. यासंदर्भात तिने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म इंस्टाग्रामवर स्वत:चे दोन सुंदर फोटो शेअर करत होणाऱ्या बाळासाठी खास पोस्ट लिहिली आहे. हे फोटो शेअर करताना रिचाने कॅप्शनम ध्ये लिहिलं आहे की, ''ही अस्वस्थता एकाकीपणामुळे आहे, पण याचं कारण म्हणजे मी एकटी नाही. एका छोट्याशा हालचालीची, गुडघ्याची, अचानक लाथ मारण्याची, कोणीतरी आपलं बोलणं ऐकत असल्याची, मला सतत आठवण होते असते. कळी उमलण्याची वाट पाहत असलेली कळीची सतत आठवण येते. आजा यार.''

रिचाच्या या पोस्टवर सेलिब्रिटींच्या कमेंट

रिचा चड्ढाच्या या इंस्टा पोस्टवर अभिनेता आयुषमान खुराना याची पत्नी आणि लेखिका ताहिरा कश्यप आणि सबा पतौडी यांनीही कमेंट करत प्रतिक्रिया दिली आहे. ताहिराने कमेंट सेक्शनमध्ये ''आजा यार'' लिहिलं आहे. तर सबाने हार्ट इमोजी शेअर केला आहे. बॉलिवूड सेलिब्रिटींसह रिचाच्या पोस्टवर चाहत्यांनीही प्रेमाचा वर्षाव करत रिचा आणि होणाऱ्या बाळाच्या आरोग्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

मुलांना भावना साक्षर कसे कराल?

एका ठरावीक वेळेनंतर टीनएजर्स मुलांमध्ये विचार, मतं, पद्धती, लाइफ स्टाइलची आवड, भावना निर्माण होतात. भावना या तात्पुरत्या असतात. भावनांक समृद्ध झाल्याने, येणारा संयम वापरून, त्या व्यक्त केल्यास, मुलांना त्यातून संस्मरणीय अनुभव येऊ शकतात.

आनंदी पालकत्व - डॉ. स्वाती गानू

श्रुतिका घरी आली, तीच मुळी फणफण करत. ती कॉलेजमधून आता येईलच म्हणून आईने तिच्या आवडीचं खायला केलं होतं; पण तिने आईला स्पष्ट सांगितलं. आई प्लीज, मला नकोय हे. रोज रोज घरगुती पदार्थ. काही तरी स्पायसी, जरा वेगळं करत जा गं. ही मिडलक्लास मेन्टलिटी सोड. आहे त्यातच भागवायची. सारखी काटकसर. मन मारून जगत राहायचं आणि आम्हालाही तसंच जगत राहायला लावायचं. कॉलेजमध्ये ट्रीट द्यायची, तर शंभर वेळा विचार करावा लागतो आणि मग जर आपण देऊ शकणार नसू, तर मग इतरांनी दिलेलं कसं खायचं? श्रुतिका वैतागून बोलतच होती. तशी आईजवळ आली आणि म्हणाली, आज काय झालंय की, तुझा स्वतःवरचा ताबा सुटलाय? आईच्या शांत आवाजाने श्रुतिका भानावर आली. तिचा स्वर थोडा खाली आला; पण आवाजात संताप होताच. चीड, वैताग होता. आई चिडू नको तर काय करू? ती मैफली, सुदीप, निशा, देविका सगळे शॉपिंगला चाललेत आज. सेंट्रल मॉलला ५०% ऑफ आहे. मी म्हटलं मला जमणार नाही, तर देविका आणि मैथिलीने मला टॉन्ट मारला आणि म्हणाल्या, तिला कशाला आग्रह करताय? तिला शक्य तरी आहे का, हे फॉर्ड करणं? अगं आई माझा संताप आवरला नाही. मी तिला म्हटलं, मी सेंट्रल मॉलला नाही फिनिक्स मॉलला जाणार आहे उद्या, तर ते सगळे माझ्याकडे बघून हसायला लागले. मी खूप सुनावलं त्यांना श्रुतिका हे सगळं खरं असलं, तरी तुझ्या भावना व्यक्त करण्याचा मार्ग योग्य नव्हता, असं वाटत नाही का तुला? आई म्हणाली.

असे प्रसंग अलीकडे घराघरात वारंवार घडतात.मुलं ८ वी, ९वीत आल्यापासूनच त्यांना आपल्या मित्र-मैत्रिणीत अशा प्रसंगांना तोंड द्यावे लागते. कधी दिसण्यावरून, कधी अभ्यासातील प्रगतीवरून, कधी ट्रीप, शॉपिंग, हॉटेलिंग, मित्र इ. सारख्या गोष्टींवरून त्यांची एकमेकांशी घट्ट मैत्री होतेही आणि तुटतेही. या वयातील मुलांकरिता त्यांना आपल्या भावना व्यक्त करणं' शिकावं लागतं.

अगदी लहान मुलं भूक लागली, कपडे ओले झाले तर रडून आपल्या भावना व्यक्त करतात. थोडं मोठं झाल्यावर आपल्याला हवी ती वस्तू नाही मिळाली की हातपाय आपटतात, जमिनीवर लोळतात. त्या नंतरच्या वयात थोडी कुरकुर असते. आपल्याला हवी असलेली गोष्ट मिळण्यासाठी सामाजिक, सार्वजनिक जागी आपला नंबर येईपर्यंत थांबण्याची सवय लागते. या सर्व प्राथमिक स्तरावरच्या भावना सांभाळताना जुळवून घेता येते; परंतु साधारणतः टीनएजर्स मुलांमध्ये मी कोणी तरी आहे.मलाही विचार, मतं आहेत. मला अमूक पद्धतीने, विशिष्ट लाइफ स्टाइलने जगायचंय अशा भावना निर्माण होऊ लागतात. म्हणूनच या भावना समजून घेणं, त्या योग्य पद्धतीने व्यक्त करणं, दुसऱ्याच्या भावना जाणून घेणं, त्यांचा आदर करणं हे जीवनकौशल्य (श्रळषश ीज्ञळश्रश्र) कधी सहज, मित्र-मैत्रिणींबरोबर राहून, समाजातील इतर व्यक्तींशी आंतरक्रिया (ळपींशीरलींळेप) करून आत्मसात करता येतात. पण कधीकधी ते शिकावंही लागतं. त्याची जाणीव करून द्यावी लागते.

श्रुतिका ज्या मित्र-मैत्रिणींच्या गटात रोज राहते. त्यात ती तिच्या राहणीमानापेक्षा वेगळ्या किंबहुना उच्चवर्गीय अर्थात श्रीमंत मित्र वर्तुळात असते. त्यामुळे तिचा संताप झाला; परंतु त्या संतापाच्या भावना व्यक्त करताना, तो सारा राग तिने आईकडे ज्या शब्दांत व्यक्त केला, ते शब्द निश्चितच चुकीचे होते. भावना मग ती कधी असते प्रेमाची. एखाद्या मुलाचं एखाद्या मुलीवर प्रेम बसते. समोरची व्यक्ती आपल्याला खूप आवडली असली, तरी आपण प्रथम आपल्या मनातील भावना आकर्षणाची आहे की प्रेमाची आहे, हे समजून घ्यावं आणि समोरच्यालाही माझ्याबद्दल प्रेम वाटायलाच हवं असा अट्टहास, दहशत दाखवणं योग्य नाही हे कळायला हवं. आपल्याला आपल्या भावना समजून, त्यावर नियंत्रण ठेवता आलं पाहिजे, हे मुलांना मुद्दामहून सांगायला काहीच हरकत नाही.

या वयातल्या मुलांच्या मनात असूया राग, तुलना, श्रेष्ठत्व, समूहांमध्ये म्हणजेच ग्रुपमध्ये राहून मदत करण्याची किंवा त्रास देण्याची वृत्ती, उद्धटपणा किंवा नम्रता, करुणा-दया किंवा संताप-तिरस्कार या आणि अशा खूप भावना असतात. घरी किंवा बाहेर त्या व्यक्त करण्यापूर्वी समजून घ्यायच्या असतात. कारण आपल्याला आनंद होतोय, मदत करावीशी वाटतेय, त्रास देण्यात मजा वाटतेय, पैसे उडवण्यात, बंधनमुक्त जगण्यात, उद्धटपणे वागण्यात धमाल वाटतेय इतरांचा संताप येतोय की तिरस्कार वाटतोय, कधी खूप एकटं वाटतंय, उदास वाटतंय, सारं संपलंय अशी निराशेची भावना दाटून येते हे आधी समजायला तर हवं आणि तसं वाटत असेल तर ते योग्य पद्धतीने व्यक्त करता यायला हवे.शाळांमधून अशा प्रकारचे संवाद झाले, तर मुले मोकळी होतील. गटचर्चेत किंवा व्यासपीठावर बोलताना अमूक एखादा प्रसंग घडल्यास त्याप्रसंगी, त्यावेळी तुम्ही कसे व्यक्त व्हाल, अर्थात मुलांचा प्रतिसाद कसा असेल याबद्दल त्यांना बोलतं करायला हवं. कारण अशा प्रकारे भावना व्यक्त कशा कराव्यात, त्यासाठी मुलं विचार करू लागतात. या विचार प्रक्रियेतूनच ते आपल्या आणि दुसऱ्याच्या भावना समजू शकतात. कुटुंबातही पालक एखाद्या दुर्घटनेच्या वेळी, दहशतवादी हल्ला, आकस्मिक संकटप्रसंगी आपल्या भावना कशा व्यक्त करतात? रिक्ट होतात की रिस्पॉन्ड करतात? संयमाने आणि संतुलित पद्धतीने व्यक्त होतात का? याचं अनुकरण मुलं करत असतात.

भावना व्यक्त करणं, त्या समजून घेणं, स्वतःच्या भावना नियंत्रित करणं, गटाचा (र्सीींी)चा प्रभाव, मैत्री हे सगळे भावना नियंत्रण जीवनकौशल्याचे टप्पे आहेत. एखादे पुस्तक, सीरियल, नाटक, चित्रपट, घडलेली घटना यांवर शाळेप्रमाणेच घरातही चर्चा करून, मुलांना आपली मते मांडायला लावावी म्हणजे त्यांना काय वाटते हे आपल्याला कळू शकते.

इमोशनल सेल्फ रेग्युलेशन' हे अत्यंत महत्त्वाचे आणि आयुष्यभर उपयोगी ठरत असते. आपल्या विचार करण्याच्या कौशल्यावर, बुद्धीवर, आपल्या भावना वरचढ ठरायला नकोत. त्यांनी आपल्याला ठरविलेल्या ध्येयापासून विचलित करू नये. या भावना निर्माण होण्याच्या कारणापेक्षा एक ड्रायव्हिंग फोर्स' म्हणून बघण्यासाठी असते. त्यातूनच आपली भावनिक बुद्धिमत्ता वाढत असते आणि योग्य निर्णय घेण्यासाठी आवश्यक असणारा मनाचा सकारात्मक दृष्टिकोन ती तयार करत असते. प्रत्यक्ष संधी देऊन, याचा मुलांना अनुभव द्यायला हवा.

भावना या तात्पुरत्या असतात. ती मनाची एक तात्कालिक अवस्था असते. म्हणूनच ती चुकीच्या पद्धतीने व्यक्त करून नंतर पश्चाताप करण्यापेक्षा शक्य तितका भावनांक समृद्ध झाल्याने, येण-ारा संयम वापरून, त्या व्यक्त केल्यास, मुलांना त्यातून संस्मरणीय अनुभव येऊ शकतात.

यशवंत महाशब्दकोडे

आडवे शब्द

१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे-येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्ल्वीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द

१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार आ-ळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई-वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

कोडे क्र.६ चे उत्तर

आडवे उत्तर

१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.साम ना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा

उभे उत्तर-१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ



४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५९.वर ६१.सर ६२.नवागत ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ५३.माजघर ५५.कलम ६४.साम्य ६५.नापास ६७.म ७५.सोय ७७.गर ७८.धन ५६.पळपुटा ५७.रमताराम सलत ६८.सागवान ६९.गवा ७९.कंस

संस्कारभूषण : नरले सर

उदगीर तालुक्यातील एकुरका रोड या छोट्याशा गावात गणपतराव नरले व भामाबाई नरले यांच्या पोटी रुक्माजी नरले यांचा जन्म झाला. आई – वडील दोघेही प्रामाणिक व सज्जन वृत्तीचे होते. घरात एकत्र कुटुंबपद्धती होती, एकत्रित कुटुंबात जे संस्कार मिळतात ते इतरत्र कितीही पैसे दिले तरी ते मिळत नाहीत. एकत्रित कुटुंबात मायेची मिळणारी ऊब व एकमेकांना कोणत्याही परिस्थितीत मिळणारी तातडीची मदत हे कोठेही मिळत नसते. अशा कुटुंबात मुलाच्या वाढत्या वयातील त्यांची जडणघडण व त्यांच्यावर होणारे सकारात्मक संस्कार हे एकत्रित कुटुंबाच्या घरात होताना दिसतात. अशा घरात कोणतेही कार्य असो अगदी सहज शक्य होते. अशा एकत्रित कुटुंबात राहण्याचा सर्वात मोठा फ्फायदा म्हणजे घरातील मुला – बाळावर असलेला सामजंस्यपणा, आपलेपणा, प्रेमळवृत्ती, मनमिळाऊ पणा आणि एकमेकांशी असलेला आदरभाव हे खुप महत्त्वाचा असतो. अशा घरातील कर्ता पुरुष गणपतराव नरले होते. ते सर्वांशी आपुलकीने वागायचे, ते पण अति मेहनती, कष्टाळू, इमानदारी वृत्तीचे होते.

रुक्माजीचा जन्म झाला तेव्हा घरात आनंदी वातावरण निर्माण झाले, पण हा आनंद फ्फार काळ टिकला नाही. कारण रुक्माजी जेमतेम चार महिन्याचे असताना त्यांच्या आई भामाबाई यांचे निधन झाले. रुक्माजी हे आईविना पोर, आई विना घर पाहवत नव्हते. बाळाला आईचा सहवास फ्फक्त चार महिनेच लाभला, या बाळाला आईची माया मिळाली नाही, आईच्या प्रेमापासून बाळ पोरके झाले. आई म्हणजे शांतादुर्गाचे रुप असते, मायेचा सागर असते. कवी यशवंत म्हणतात, म स्वामी तिन्ही जगाचा, आईविना भिकारी म ही ओळ मआई म या शब्दाची महानता सांगून जातो. आईच्या मायेची ऊब, प्रेम, वात्सल्य, ममता यापासून बाळ खुप दूर होते. बाळ रुक्माजी जेव्हा बोलायला लागला तेव्हा त्याच्या तोंडून पहिला शब्द आई (माय) बाहेर पडला. तेव्हा बाळ आई, आई म्हणत इकडे– तिकडे पाहत होते. हा प्रसंग पहावत नव्हता. हा प्रसंग पाहणाऱ्यांच्या डोळ्यातून अश्रू तरळत होते. या बाळाचे पालनपोषण वडिलांनाच करावे लागले होते. कारण तेव्हा गणपतराव नरले यांचे भाऊ वेगळे म्हणजे स्वतंत्र झाले होते. गणपतराव नरले यांच्यावर फ्फार वाईट वेळ आली होती. या बाळाच्या आईची आणि वडिलांची भूमिका गणपतराव नरले पार पाडत होते. नंतर रुक्माजी हळूहळू मोठा होवू लागला. वडिलांनी रुक्माजीला शाळेत घालायचे ठरवले. तेव्हा गावात शाळा नव्हती, गावाच्या जवळच वाढवणा (बु.) होते . तेथील शासकीय शाळेत रुक्माजीला दुसरीच्या वर्गात प्रवेश दिला. वडिलांनी रुक्माजीला दररोज तयार करून खांद्यावर घेऊन शाळेत सोडायचे व नंतर सायंकाळी परत घेऊन यायचे. असे नित्यनेमाने करत होते. अशा प्रकारे रुक्माजीची आई व वडील हे गणपतरावच होते.

यामुळे मला वाटते की आईला आई होता येणं हा तिचा मुळ स्वभाव धर्म असतो, पण वडिलांनी कोणाची तरी आई बनणं हे अत्यंत अवघड व कठीण काम असते.

नंतर तेथून रुक्माजी दहावी पर्यंतचे शिक्षण घेतले, दहावी पास झाले याचा सर्वात जास्त आनंद वडील गणपतराव यांना झाला. मुलगा रुक्माजी पण दररोज सकाळी पहिल्यांदा वडिलांच्या पाया पडून दर्शन घेत असत, आपले वडीलच भाग्यविधाते आहेत, सर्वस्व वडीलच आहेत असे तो मानायचा. तो कधीही वडिलांच्या शब्दा बाहेर जात नव्हता. वडिलांच्या शब्दांचा मान राखला जायचा. रुक्माजी शिक्षण घेत असताना शेजारील गावचा सावकार तुकाराम माळी हे त्यांना वहया,पुस्तके, पेना घेऊन देत होते आणि वेळोवेळी आर्थिकमदतहीकरायचा. पुढील शिक्षणासाठी रुक्माजी सोलापूरच्या दयानंद महाविद्यालयात प्रवेश घेतला. तेथून ते पी. डी. उत्तीर्ण झाले. नंतर नांदेड येथील पिपल्स कॉलेजमधून

बी. ए. झाले.

रुक्माजीची वागणूक पण साधी, सरळ, सभ्य होती. तो सर्वांना आवडीने बोलायचा. तो गावातील सर्वांच्याच आवडीचा मुलगा होता. तो दररोज सकाळी – संध्याकाळी मारुतीच्या मंदिरात जावून दर्शन घेत. रुक्माजीचे लहान वयातच लग्न केले होते, वडिलांनी त्यांच्या बहिणीच्या मुलीशी रुक्माजीचे लग्न केले होते.

पुढे रुक्माजी उच्चविद्याविभूषित झाल्यानंतर गावातच समर्थ विद्यालयाची सुरुवात झाली होती. तेव्हा गावातच नोकरी करावी म्हणजे वडिलांसोबत राहता येईल, दुसरीकडे गेलो तर वडील एकटे राहतील . या विचाराने गावातच नोकरी केलेली उत्तम राहील. या उद्देशाने गावातच नोकरी करायचे ठरवले.

दि. १ /६/१९६७ रोजी ज्ञानदानाच्या कामास प्रारंभ झाला. जन्मभूमी आणि कर्मभूमी एकच म्हणजे एकुरका रोड . श्री नरले सर यांच्यात असलेले उत्कृष्ट प्रभावी गुण, कर्तबगारी, हुशारी, चांगुलपणा, चाणाक्षता, लवचिकता, प्रामाणिकपणा, विद्यार्थ्यांसाठी असलेली तळमळ आणि शाळेसाठी धडपड हे गुण पाहून त्यांना शाळेच्या मुख्याध्यापक पदी नेमणूक केली आणि मुख्याध्यापक पदाला शोभेल असे कार्य करण्याची कार्यशैली त्यांच्यात असल्यामुळे ही जबाबदारी त्यांनी अत्यंत कुशलतेने पार पाडले. त्यांनी व्याख्याने, परिसंवाद, संमेलन, शिक्षणाविषयीचे नवीन धोरण, महापुरुषांच्या जयंत्या, पुण्यतिथी, जागतिक दर्जाचे धोरण, साक्षरता अभियान व पर्यावरणाचे महत्व या संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत होते. सर आपले कार्य करीत असताना गोरगरीब, अशिक्षित, आर्थिक मागासलेपणा, दीन–दलित,कष्टकरीव्यक्तींच्या भविष्याचा विचार करून त्यांना शिक्षणासाठी मार्गदर्शन व आर्थिक सहकार्य केले. शिक्षण हे सर्वासाठी आहे आणि गोरगरिबांची मुले शिक्षण घेतली पाहिजे म्हणून त्यांना शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगत. मजसे मुख्याध्यापक तशी शाळा असते म.शाळेचा परिसर पाहिला की त्या शाळेचा मुख्याध्यापक कसा आहे हे समजते. त्यांनी आपल्या जीवनात प्रथम प्राधान्य शाळेला, शाळेतील अध्यापनाला दिले नंतर उर्वरित आपल्या संसाराला... अशी त्यांची दिनचर्या होती. सरांच्या कारकिर्दीतील शाळा ही एक आदर्श शाळा म्हणून परिचित होती. कारण शाळेमुळे आपल्यामध्ये आत्मविश्वास निर्माण झाला, समाजात वावरण्याची ताकद येते. जीवनातील शिक्षकांचे महत्व, स्थान काय असते हे त्यांनी शिक्षकांना मार्गदर्शन करताना सांगितले, केवळ पैशासाठी, मान–सन्मानासाठी शिकवणारा शिक्षक सेवेत असतानाही निवृत्त झालेला असतो. खरा शिक्षक हा सदैव कार्यरत असतो. शिक्षणातील अनेक बारकावे शिक्षकांना व्यवस्थितपणे ,मुद्देसूद पणे सखोल मार्गदर्शन केले. शिक्षकांच्या जबाबदाऱ्या व भूमिका तसेच शिक्षक सर्वोत्तम एक विचारवंत असावेत असेही सांगितले.

अपयश म्हणजे सर्वकाही संपले असे नाही, तर नव्या उमेदीने अभ्यास करून यश संपादन करून स्वत:च्या जीवनात नवचैतन्य निमर्ण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे.हे मुलांना समजावून सांगत.

शिक्षणातील आनंदयात्री आदरणीय दि. लिं. होळीकर सरांशी त्यांचा सलोखा होता. या दोघांत सतत शिक्षणाविषयी चर्चा होत व विचारांची देवाणघेवाण होत असत. अशा विचारातून नरले सरांच्या विचारांची शिदोरी अनेकांना उपयोगी पडत. अशा एकून सर्व बाबींचा विचार करून त्यांचा महाराष्ट्रशासनातफ्फे आदर्श शिक्षक म्हणून सन्मान करण्यात आला. नरले सर अनेकांच्या जीवनातील आदर्श विचारांचे मार्गदर्शक होते. त्यांनी अनेक विषयांवर लेखन केले आहे, विविध समित्यांवर कार्यरत राहून आपले विचार तळागाळातील लोकापर्यंत पोहचविले. हे करत असताना त्यांनी कधीही विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष केले नाही.

एक आवर्जून उल्लेख करावा वाटतो तो म्हणजे ––– त्यांनी प्रसाद मासिकाचे नेहमी वाचन करीत होते. एकदा ते ङ्क आई ङ्क या विषयावर लेखन करुन या मासिकाला पाठविले. ते लेख मासिकात प्रकाशित झाला. ते लेख आदरणीय विमलताई पिंगे(या छत्रपती संभाजीनगर येथील एका नामांकित शाळेच्या मुख्याध्यापिका होत्या.) यांनी वाचन केल्या. त्यांना हा लेख फ्फार आवडला. त्यांनी पत्र पाठवून नरले सरांचे कौतुक तर केलेच पण त्यात आणखिन चार ओळी लिहिल्या त्या चार ओळीने नरले सरांना मातृत्वाचे प्रेम,छाया, वात्सल्य, माया, ममता, मायेची भावना या विचाराने प्रभावित केले. कारण सरांची आई ही सरांच्या जन्माच्या वेळी देवाघरी गेल्या होत्या. सर मायेच्या प्रेमाचे भुकेले होते. मायेचे प्रेम त्यांना आदर्श प्रेम वाटत. या पिंगेताईच्या चार ओळीने नरले सरांना आईची आठवण तर आलीच पण जन्म देणारी आई काही केल्या आता भेटत नाही. या वात्सल्य मूर्ती च्या ओळीने सरांना आई मिळवून दिले. काय होत्या त्या ओळी –– पिंगेताई लिहितात, म मला तीन मुले आहेत यापैकी एक तरी मुलाने शिक्षक व्हावे असे मनोमन मला वाटत होते, पण एकही मुलगा शिक्षक झाला नाही ते वेगवेगळ्या क्षेत्रात सेवेत कार्यरत आहेत. पण मला, आपण शिक्षक असल्याचे प्रसाद मासिकातून प्रकाशित झालेले तुमचे मनोगत वाचून समजले. मला मनस्वी आनंद झाला आणि समाधान वाटले. आपण मला माझ्या मुलासारखे वाटतात आणि मी तुम्हांला माझा मानसपुत्र मानते. म किती सुंदर विचार आहेत तुमचे, आईविषयी, आईच्या प्रेमाची केवढी वात्सल्य. किती छान अर्थाने आईच्या प्रेमाचे महत्व सांगीतलात .. खुप छान!

या चार ओळी वाचून सरांचे हृदय भरुन आले. या आईच्या मनोगतामुळे सरांना श्रीमती पिंगेताईच्या रुपाने आई मिळाली. सरांच्या एकूण जीवनातील अत्यंत महत्वपूर्ण, सुवर्ण क्षण आणि अतिशय भावुक हा क्षण या चार ओळीने मिळालेला आनंद होता. या चार ओळी सरांनी आजतागायत सांभाळून ठेवल्या आहेत.

नंतर सर सेवानिवृत्त झाले. त्यांच्याविषयी एक सिंहावलोकन लिहावा वाटतो तो असा –– आयुष्याची आणि उमेदीची तीस वर्षापेक्षा अधिक व्यस्त घालविलेला काळ नोकरीत आणि संसारात झालेली तारेवरची कसरत हे एका वर्तुळासारखा झालेला हा प्रवास. कधी परिघावरुन तर कधी केंद्रबिंदूवरही धडपड म्हणजे जिवंतपणाचे लक्षण मानायचे. करता – करविता असल्याचा भास निर्माण करायचा. जबाबदारी, कर्तव्य यांची सांगड घालता – घालता लक्षात येते .

तसेच राष्ट्रीय पातळीवर देशातील आदर्श व्यक्तीचा परिचय देण्यात येतो त्या पुस्तकात श्री नरले सरांचा परिचय घेण्यात आला आहे.

आपलं हे आदर्शवादी धडपडणारं जीवन एका क्षणिक सुखामागे धावणाऱ्या जीवनापेक्षा निश्चितच श्रेष्ठ आहे.

बिरादार तुकाराम सुदामराव
बेलशकरगा ता. उदगीर जि. लातूर
मो. नं. ७०५७३९४७७२

श्रीराम मंदिर परिसरात भक्तिमय वातावरणात

वडवळ नागनाथ (प्रतिनिधी) श्रावण महिन्याच्या पूर्वसंध्येला अनुसरून अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ दिंडोरी यांचे प्रमुख गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या आदेशानुसार लातूरच्या श्री स्वामी सेवा केंद्राच्या ३६० महिला पुरुषांनी येथील श्रीराम मंदिरात एक दिवसीय नवनाथ भक्ती सार ग्रंथाचे पारायण केले यावेळी मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण पसरले होते.

चाकूर तालुक्यातील वडवळ नागनाथ येथील श्रीराम मंदिरात झालेल्या पारायणात प्रमुख सेवेकरी विनय शिंदे यांनी निसर्ग निस्वार्थ काम करतो त्याप्रमाणे आपणही कुठल्याही फ्फळाची अपेक्षा न ठेवता निस्वार्थ काम करावे नैसर्गिक आपत्ती असो वा मानवनिर्मित (संकट)असो भक्तीचे उच्च दैवत म्हणजे नवनाथ महाराज पारायण असून या पारायण करण्याने वा कुठलीही साधना करण्याने बुद्धीचा वापर व मानवी देहातील पॉझिटिव्हिटी वाढते श्री स्वामी सेवा श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राच्या अंतर्गत गुरुपीठ त्र्यंबकेश्वर येथे पारायण करण्यात येणार असून श्रावण महिन्यात येथील वटसिद्ध नागनाथ मंदिरात व जिथे जिथे नाथाचे मंदिर आहेत त्या मंदिरात नवनाथ भक्तिसार ग्रंथाचे पारायण करण्यात येणार असल्याचे या केंद्राचे प्रमुख सेवेकरी विनय शिंदे यांनी सांगितले. श्रीराम मंदिर सभागृहात झालेल्या पारायण कर्त्या भक्तांना मा.जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब पाटील यांनी महाप्रसादाचे आयोजन केले होते. पारायण व्यवस्थित पूर्ण करण्यासाठी सेवा समितीच्या महिला प्रमुख सेवेकरी कोमल आळणे यांनी परिश्रम घेतले यांनी परिश्रम घेतले यावेळी पाऊस असूनही संपूर्ण मंदिर मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण पसरले होते याप्रसंगी गावातील भक्तांनी भरभरून प्रतिसाद दिला

वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.जे.सी.गुप्ता, सह दिवाणी न्यायालय क. स्तर, उदगीर यांच्या न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ४६१/२०२४ निशाणी क्रमांक ०६

ज्याअर्थी नामे Shindutai Vasudev Katkamwar हे दिनांक ०२.०१.२०११ रोजी Pandharpur Tq.Pandharpur Dist.Solapur येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार

Rajeshwar s/o. Vasudev Katkamwar
Age 44 yrs, Occu. Service,
R/o Nideban Tq.Udgir Dist.latur
At. Present Pandharpur Tq.Pandharpur Dist.Solapur

यांनी खालील नमूद ४ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून

Sr.No.	Name of Legal Heirs	Age	Relation of deceased
1)	Rajeshwar S/o. Vasudev Kakamwar	44	Son
2)	Prakash Vasudev Katkamwar	65	Son
3)	Aparna W/o. Sunil Wadgaonkar	50	Daughter

अर्जदार याने Shindutai Vasudev Katkamwar या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Shindutai Vasudev Katkamwar यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.
आज दिनांक: ०८/०७/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील नेमलेली तारीख: १४/०८/२०२४

आदेशावरुन

(संतोष डी. शिंदे)
कनिष्ठ लिपिक
सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

(एल.एम. सुत्राळे)
सहा.अधिक्षक,
सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.के.ए.पोवार, २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ५१४/२०२४ निशाणी क्रमांक ०७

ज्याअर्थी नामे Namdev S/o. Vithoba Jankewad and Bharatbai W/o. Namdev Jankewad हे R/o. Nalgir Tq.Udgir Dist.Latur दिनांक २१/०४/२०२४ and २३/१२/२०२३ रोजी At. Nalgir Tq.Udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार

1) Nagendra S/o. Namdev Jankewad, Age-40, Occu - Agri.
2) Arun S/o. Namdev Jankewad, Age-52, Occu.- Agri
3) Vithoba S/o. Namdev Jankewad, Age - 39, Occu - Agri
1 to 3 R/o. Nalgir Tq Udgir Dist. Latur
4) Sunita W/o. Govind Shungare, Age- 51, Occu.- H.H.
R/o. Chappal Bajar, Bhawani Mata Mandir, Hyderabad Tq. Dist. Hyderabad
5) Savita W/o. Ashok Karpewad, Age-49 Occu-H.H.
R/o. Shivajinagar, Mukhed Tq. Mukhed Dist. Nanded.
6) Savita W/o. Madhav Bhutapalle, Age-43 Occu - H.H.
7) Shivkanya W/o. Santosh Jinkalwad, Age-36 Occu - H.H.
R/o. Chondi Tq. Udgir Dist. Latur

यांनी खालील नमूद ७ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून

Sr.No.	Name of Legal Heirs	Age	Relation of deceased
1)	Nagendra S/o. Namdev Jankewad	40	Son
2)	Arun S/o. Namdev Jankewad	52	Son
3)	Vithoba S/o. Namdev Jankewad	39	Son
4)	Sunita W/o. Govind Shungare	51	Daughter
5)	Savita W/o. Ashok Karpewad	49	Daughter
6)	Savita W/o. Madhav Bhutapalle	43	Daughter
7)	Shivkanya W/o. Santosh Jinkalwad	36	Daughter

अर्जदार याने Namdev S/o. Vithoba Jankewad and Bharatbai W/o. Namdev Jankewad या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Namdev S/o. Vithoba Jankewad and Bharatbai W/o. Namdev Jankewad यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.
आज दिनांक: १२/०७/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील नेमलेली तारीख: २७/०८/२०२४

आदेशावरुन

(के.डी.सुर्यवंशी)
कनिष्ठ लिपिक
२ रे सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

(एम.एल. सुत्राळे)
सहा.अधिक्षक,
सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

उदगीर मनोरंजन
कल्पना 70MM A/C DOLBY
११:३०,२:३०,०५:३०,८:३०
दररोज ४ शो

उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर
उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर
फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

वेळ सकाळी ०९ ते ५	सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध	रविवार ९ ते १ @24 hrs X 365
१,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया	४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया	

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुगणालय
भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

मेडीकल व सर्जिकल रेटीना	डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI	३ रा रविवार
मेडीकल व सर्जिकल रेटीना	डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI	२ रा शनिवार
कॉर्नीया सर्जन	डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea)	२ रा शनिवार
नासुर तज्ञ	डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड) डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद)	२ रा रविवार ४ था रविवार
काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा	डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक	४ था रविवार

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ | डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) | डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेट्टेवाड (M.S.) | डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष | व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर | लॉ. प्रदिप बेद्रे सचिव

मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेसाठी प्रत्येक पात्र महिलेचा अर्ज भरून घ्यावा : पालकमंत्री

लातूर, : राज्यातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी सुरु करण्यात आलेल्या मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या योजनेसाठी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी ३१ ऑगस्टपर्यंत मुदत देण्यात आली आहे. ग्रामीण भागातील महिलांनी ग्रामपंचायतीमध्ये आणि शहरी भागातील महिलांनी आपल्या वार्डमध्ये सुरु करण्यात आलेल्या नावनोंदणी केंद्रात जावून विहित कागदपत्रांसह अर्ज भरून देण्याचे आवाहन पालकमंत्री गिरीश महाजन यांनी केले आहे. तसेच जिल्ह्यातील प्रत्येक पात्र महिलेचा अर्ज भरून घेण्याची कार्यवाही विहित मुदतीत पूर्ण करण्याच्या सूचना जिल्हा प्रशासनाला दिल्या आहेत.

मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना गरीब, गरजू महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी चालना देणारी ठरणार आहे. या योजनेतून प्रत्येक पात्र महिलेच्या आधार सलंग्न बँक खात्यात दरमहा १ हजार ५०० रुपये म्हणजेच दरवर्षी १८ हजार रुपये डीबीटीद्वारे थेट जमा करण्यात येणार आहे. या योजनेसाठी अर्ज करण्याची प्रक्रिया सोपी आणि सुलभ करण्यात आली आहे. महिलांकडून ऑफलाईन अर्ज स्वीकारून ते ऑनलाईन भरण्यासाठी गावपातळीवर आणि शहरी भागातही निशुल्क सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याचे पालकमंत्री श्री. महाजन म्हणाले.

या योजनेची व्याप्ती वाढवून अर्जासोबत जोडण्यासाठी सहज उपलब्ध होणाऱ्या कागदपत्रांचे विविध पर्याय देण्यात आले असून ग्रामीण आणि शहरी भागातील सर्व पात्र महिलांनी या योजनेसाठी अर्ज करावेत. १२ जुलै रोजीच्या शासन निर्णयानुसार अर्ज भरण्यासाठी काही सुलभ पद्धती सुचविण्यात आल्या आहेत. शासकीय यंत्रणांनी सर्व नवीन बदल लक्षात घेऊन योजनेची प्रभावी अंमलबजावणी करावी, पालकमंत्री श्री. महाजन म्हणाले. तसेच योजना कायमस्वरूपी असून दीर्घकाल चालणार आहे. या योजनेसाठी अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे योजनेच्या बाबतीत चुकीच्या नकारात्मकता पसरवणाऱ्या बाबींकडे दुर्लक्ष करून सर्व समाज घटकातील महिलांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. योजनेसाठी पात्र महिलांच्या नोंदणीसाठी ग्रामीण भागात, नगरपालिका, महानगरपालिका क्षेत्रात शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. त्यामुळे महिलांना आपले अर्ज सादर करण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. जिल्हा प्रशासनाने शासन निर्णयातील तरतुदीनुसार आवश्यक कार्यवाही करून प्रत्येक पात्र महिलेचे अर्ज विहित कालावधीत भरून घेण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्याच्या सूचनाही पालकमंत्री श्री. महाजन यांनी दिल्या.

दुर्मिळ वनस्पती औषधी वनस्पती आणि जंगली वनस्पतींचे वृक्षारोपण

सोलापूर / प्रतिनिधी- गोरखचिंच, कुडा, भेहडा, हिरडा, अर्जुन, साल, राळ, धूप, कापूर बावची, यासारख्या यासारख्या वेगवेगळ्या जंगली, औषधी आणि दुर्मिळ अशा ३६० वनस्पतींचे वृक्षारोपण निसर्गवारी बहुउद्देशीय संस्था पाकणी यांच्या वतीने करण्यात आले आहे. श्री सिद्धेश्र्वर फाउंडेशन व निसर्ग वारी कृषी पर्यटन केंद्र यांच्या सहकार्याने हा उपक्रम आयोजित करण्यात आल्याची माहिती संस्थेच्या संचालिका डॉक्टर सुवर्णा चवरे यांनी दिली.

मौजे पाकणी तालुका उत्तर सोलापूर येथे असलेल्या एक एकर क्षेत्रामध्ये या वनस्पतीची लागवड करण्यात आली आहे. यावेळेस सिद्धेश्र्वर फाउंडेशनचे अनिल सर्जे, सुनील सर्जे, शहा, साळुंखे, श्री .मेश्राम, वेणू भोजने, सुप्रिया महिंद्रकर, पुष्पा व भारत काकडा, डॉ.शिल्पा व प्रशांत लांडे, डॉ सारिका व प्रमोद इंगळे, राम शिंदे, सुजाता व प्रसाद काटकर, इत्यादी ४५ वृक्ष प्रेमींनी वनस्पती लागवडीमध्ये सहकार्य केले.

सोलापुरातील विद्यार्थ्यांना, अभ्यासाकांना तसेच वनस्पती शास्त्रज्ञाना एकाच ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वेगवेगळ्या वनस्पतींची माहिती व्हावी आणि पर्यावरण संतुलन होण्यास मदत व्हावी, याकरता हा उपक्रम राबवल्याचे कृषी पर्यटन केंद्राच्या संचालिका डॉक्टर सुवर्णा चवरे यांनी सांगितले.

विदेशी वनस्पतींची लागवड करण्यापेक्षा स्थानिक व देशी वनस्पती लागवडीचे अनेक फायदे असल्याने, शेतकरी बंधू तसेच सामाजिक संस्थांनी देशी आणि स्थानिक वनस्पतींना प्राधान्य द्यावे असेही आवाहन त्यांनी केले आहे. श्री सिद्धेश्र्वर फाउंडेशन सोलापूर व निसर्ग वारी कृषी पर्यटन केंद्र यांच्या पदाधिकाऱ्यांनी ही झाडे जगवण्यासाठी वेळोवेळी या ठिकाणी भेट देऊन, काळजी घेण्याचा निर्धार व्यक्त केला. वृक्ष लागवड करण्यासंदर्भात श्री अनिल सर्जे यांनी लिहिलेली प्रतिज्ञा उपस्थित सर्वांनी घेतली.

उपक्रम आयोजित केला होता. गंजगोलाई ते हनुमान मंदिर चौक परिसरात वन विभाग आणि खासगी रोपवाटिकांचे रोपांचे प्रदर्शन व विक्रीचे स्टॉल लावण्यात आले होते. यामध्ये औषधी वनस्पती, शोभेची झाडे, परसबागेमध्ये लावण्यायोग्य झाडे, फळझाडे व फुलझाडांची रोपे, वृक्षारोपणासाठी आवश्यक सेंद्रिय खते, कुंड्या व इतर आवश्यक साहित्य विक्रीसाठी ठेवण्यात आले होते. तसेच मिलेटसपासून तयार करण्यात आलेल्या खाद्यपदार्थांच्या विक्रीसाठी महिला बचतगटांचे स्टॉल उभारण्यात उभारण्यात आले होते.

जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे आणि जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सागर यांच्या उपस्थित वृक्ष लागवडीने लातूर हरितोत्सवला प्रारंभ झाला. सकाळपासूनच लातूरकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून येत होता. जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सर्व स्टॉलला भेटी देवून तेथे आलेल्या नागरिकांशी संवाद साधला. तसेच त्यांना वृक्ष लागवडीचे आवाहन केले.

रविवारची सुट्टी असल्याने अनेकजण आपल्या परिवारासह या उपक्रमात उपस्थिती लावून रोपवाटिकांच्या स्टॉलवर रोपांची खरेदी करीत होते. यामध्ये लहान मुले आणि महिलांचा सहभाग लक्षणीय होता. आपल्या आवडीची रोपे खरेदी करण्याकडे त्यांचा कल होता. यामध्ये लहान मुले फळांची आणि महिला तुळस, आवळा, कोरफड या औषधी वनस्पतींसह फुलझाडांची रोपे खरेदी करण्यास पसंती देत असल्याचे दिसून आले. तसेच अनेकजण आपल्या शेतामध्ये, अंगणात लावण्यासाठी चिंच, कडूनिंबाची रोपे खरेदी करीत असल्याचे दिसून आले. दुपारी काहीकाळ पावसाने हजेरी लावल्यानंतर पुन्हा सायंकाळी नागरिकांनी रोपे खरेदी करण्यासाठी गर्दी केली होती.

वन, कृषी विभागामार्फत वृक्ष लागवडीबाबत जनजागृती

वृक्ष लागवडीविषयी माहिती देण्यासाठी, तसेच सवलतीच्या दरात रोपे विक्रीसाठी खासगी रोपवाटिकांसह वन विभागाच्या लातूर, अहमदपूर आणि निलंगा परिक्षेत्र आणि सामाजिक वनीकरण विभागामार्फत स्टॉल लावण्यात आले होते. सहायक वनसंरक्षक वैशाली तांबे, सामाजिक वनीकरणचे विभागीय वन अधिकारी अमितराज जाधव, वनपरिक्षेत्र अधिकारी सचिन रामपुरे, अश्विनी अपेट, निलेश बिराजदार यावेळी उपस्थित होते. लातूर हरितोत्सवमध्ये कृषी विभागाच्या फळरोपवाटिकांचे स्टॉल लावण्यात आले होते. तसेच पौष्टिक तृणधान्य लागवडीबाबतही कृषि विभागामार्फत जनजागृती करण्यात आली.

भावी पिढीसाठी ऑक्सिजन बँक तयार करण्यासाठी वृक्ष लागवड करा : जिल्हाधिकारी

वृक्ष लागवड मोहिमेला गती देण्यासाठी आयोजित लातूर हरितोत्सव आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमाला लातूरकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. जिल्ह्यात वृक्ष लागवड मोहीम गतिमान करून आपल्या भावी पिढीला वृक्षांचा वारसा देवून त्यांच्यासाठी ऑक्सिजन बँक तयार करण्याची जबाबदारी आपल्या प्रत्येकावर आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने वृक्ष लागवड मोहिमेत सहभागी होवून एक व्यक्ती-एक झाड या संकल्पनेतून वृक्ष लागवड करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले. तसेच ङ्गलातूर हरितोत्सवफआयोजनात सहभाग नोंदविणाऱ्या सर्वांचे अभिनंदन केले.

मुख्यमंत्री- माझी..

नोंदणी आणि प्राप्त अर्जांची छाननी व ऑनलाईन करण्याची प्रक्रिया अधिक गतीने होण्यासाठी संबंधितांना सूचना देण्यात याव्यात. तहसीलदार, गट विकास अधिकारी आणि बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी याबाबत योग्य समन्वय व नियोजन करावे. सर्व संबंधित उपविभागीय महसूल अधिकारी यांनी वेळोवेळी आढावा घेण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या.

ग्रामीण व शहरी भागातील अर्ज स्वीकृती केंद्रात प्राप्त होणाऱ्या अर्जांच्या यादीचे नियमितपणे चावडी वाचन करावे. या चावडी वाचनाबाबत दवंडीद्वारे नागरिकांना पूर्वकल्पना द्यावी. चावडी वाचनात नोंदविण्यात येणाऱ्या आक्षेपांचा अहवाल तालुकास्तरीय समितीकडे पाठविण्यात यावा. शासन निर्णयात नमूद केल्यानुसार विविध योजनांच्या लाभार्थी महिलांची गावनिहाय यादी तयार करून त्यांची मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेसाठी नोंदणी करून घेण्यात यावी. पिवळ्या व केशरी रेशनकार्डधारक महिलांच्या नोंदणीसाठी रास्त भाव दुकानदारांचे सहाय्य घेण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या.

निवासी उपजिल्हाधिकारी श्री. नेटके आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. शेख यांनी तालुकानिहाय प्राप्त अर्जांची माहिती दिली.

पान १ वरून

संवाद यात्रेच्या...

बावनकुळे म्हणाले.

विरोधकांची भूमिका निंदनीय

आरक्षण विषयासंदर्भात मुख्यमंत्र्यांनी बोलाविलेल्या सर्वपक्षीय बैठकीवर विरोधी पक्षांच्या नेत्यांनी बहिष्कार टाकून योग्य केले नाही. मराठा आणि ओबीसी समाजाच्या हितासाठी ही बैठक होती. विरोधकांची भूमिका निंदनीय आहे. अशी भूमिका महाराष्ट्राच्या हिताची नाही. विरोधक जातीपातीचा राजकारण करत आहे हे जनतेला दिसले. चुकून महाराष्ट्रात मविआ सरकार आले तर लोकांच्या लाभाच्या योजना बंद होतील. महाराष्ट्रातील जनतेला डबल इंजिन सरकार हवे आहे.

मुख्यमंत्र्यांची...

अनेक मुद्द्यांच्या आधारे हे महामंडळ निर्माण करण्यात आलं आहे. मुख्यमंत्र्यांकडून वारकरी महामंडळाच्या आदेशाची प्रत वारकऱ्यांना देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री वारकरी महामंडळाच्या महत्त्वाच्या योजना कोणत्या?

सर्व पालखी मार्गांची सुधारणा, स्वच्छता, आरोग्य, निवारा आणि सुविधा यासाठी दरवर्षी आर्थिक तरतूद करून नियोजन.

आषाढी आणि कार्तिकी वारीसाठी येणाऱ्या वारकऱ्यांना सुरक्षा, विमा संरक्षण कवच.

वारकरी भजनी मंडळाला भजन आणि कीर्तन साहित्यासाठी (टाळ, मृदंग, वीणा आदी) अनुदान.

कीर्तनकारांना आरोग्य विमा, मानधन सन्मान योजना.

पंढरपूर, देहू, आळंदी, मुक्ताईनगर, सासवड, पिंपळनेर, त्र्यंबकेश्र्वर, पैठण, कोल्हापूर संस्थान, शेगाव, तारकेश्र्वर, भगवानगड, अगस्तऋषी, संत सावतामाळी समाज मंदिर, अरण (ता. माढा, जि. सोलापूर) व इतर तीर्थक्षेत्रांचा विकास.

चंद्रभागा, इंद्रायणी, गोदावरी व इतर नद्या प्रदूषणमुक्त करण्याबाबतची कार्यवाही.

भुजबळांची...

त्यावर मी त्यांना सांगितलं की हाके आणि उपोषण करणाऱ्यांना सांगण्यात आले आहे की उपोषण सोडा आणि चर्चा करु, त्यावर मार्ग काढू. जरांगेंना सरकारने काय सांगितले हे मला माहिती नाही. ते तुम्ही शरद पवारांनी विचारायला हवं, मुख्यमंत्र्यांना विचारायला हवे. तुम्ही आज राज्याचे ज्येष्ठ नेते आहेत, आणि सर्व समाजघटकांची गावागावात जिल्ह्याजिल्ह्यात काय परिस्थिती आहे याचा अभ्यास तुम्हाला जास्त आहे. आम्ही मंत्री झालो किंवा मुख्यमंत्री झालो म्हणजे आम्हाला सगळाच अभ्यास आहे असे समजायाचं कारण नाही. त्यामुळे तुम्ही यामध्ये पुढाकार घ्यायला हवा, असे मी म्हणालो.

चर्चा करायला मी तयार : शरद पवार

त्यावर पवार साहेब म्हणाले, आम्ही आलो नाही कारण आम्हाला तुम्ही काय चर्चा केली हे माहितीच नाही. शिवाय ५० लोकांमध्ये कशी काय चर्चा होऊ शकते. यावर मी म्हणालो, तुम्ही सांगा, तुम्ही बोलवा, आम्ही यायला तयार आहोत. त्यावर त्यांनी विचारले कुणाची काय काय मतं आहेत ते सांगा. मग पवार साहेब म्हणाले, मी एक दोन दिवसात मी स्वतः मुख्यमंत्र्यांशी बोलतो, आम्ही काही लोक एकत्र बसतो, काय करायला पाहिजे, कसा प्रश्न सोडवता येईल यावर चर्चा करायला मी तयार आहे, असं पवार म्हणाले. मी म्हणालो, तुम्ही सांगितलं, तुम्ही बोलावलं तर सगळे मंत्री येतील, मुख्यमंत्रीही येतील.

राज्यातील वातावरण शांत असायला हवे : छगन भुजबळ

छगन भुजबळ म्हणाले, हा प्रश्न सोडवावा, ओबीसी, मराठा समाजाचा प्रश्न सुटावा, हे तंग वातावरण शांत व्हावे हा माझा हेतू आहे. यासाठी मी कुणालाहि भेटेन. राहुल गांधी असो की पंतप्रधान सर्वांना भेटायला मी तयार आहे. परंतु राज्यातील वातावरण शांत असायला हवं, गोरगरिबांची घरे पेटता कामा नये, एकमेकांच्या जिवावर उठता कामा नये, यामध्ये कोणतंहि राजकारण नाही. त्यावर पवार म्हणाले, तुम्ही मीडियाला सांगा आम्ही यामध्ये राजकारण आणणार नाही. सामाजिक प्रश्न म्हणून याकडे बघू आणी, काही लोकांशी चर्चा करु.

ओपनमध्ये चर्चा होणे कठीण दिसते

आमची दीड तास चर्चा झाली. धनगर आरक्षणावरही चर्चा झाली. सर्व समाजाच्या आरक्षण प्रश्नावर चर्चा झाली. सर्व प्रश्नावर साधक बाधक चर्चा झाली. ते तयार झालेत, दोन चार लोकांना ते बोलावतील किंवा मी येतो असे ते म्हणाले. ओपनमध्ये चर्चा होणे कठीण दिसते, त्याला राजकारणाचा वास लागतो आणि प्रश्न सुटण्याऐवजी वाढत जातो. त्यामुळे याबाबत काय करता येईल, काय पावले उचलायला हवी हे कळून येईल.

हा राजकारणाचा विषय नाही, जे सभागृहात झाले ते सांगितले. मला ना राजकारणाची पर्वा आहे, ना आमदारकीची, ना मंत्रिपदाची. राज्य शांत व्हायला हवं, मी कुणालाहि भेटण्यास, कुणाच्याहि घरी जायला, कुणालाहि विनंती करायला मला कमीपणा वाटणार नाही. मी शरद पवारांच्या भेटीला जाताना फक्त प्रफुल पटेल यांना बोललो. कोणत्या विषयावर बोलणार आहे हे सांगितले, त्यावर ते जा म्हणाले, असेहि शेवटी छगन भुजबळ यांनी स्पष्ट केले.

गडावर...

तसेच लंडनच्या वस्तूसंग्रहालयातून आणण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या वाघनखांच्या मुद्द्यावरही मुनगंटीवार यांनी भाष्य केले. शिवाजी महाराजांच्या वाघनखांना घेऊन एका इतिहासकाराने विरोध केला आहे. मात्र, त्यामुळे राज्य सरकार आपली भूमिका बदलणार नाही, असे मुनगंटीवार यांनी म्हटले.

विधानपरिषद...

पदाचा मुद्दा उपस्थित केला होता. सभागृह संविधानाप्रमाणे चालले पाहिजे. सभापतीची निवडणूक लावण्याबाबत ठराव मांडणार आहे, यावर आपल्याला चर्चा करावी लागेल, असे जयंत पाटील म्हणाले. गेली अनेक वर्षे सभापतीपद रिक्त आहे. एका मर्यादेपर्यंत तुम्ही उपसभापती असूनही सभापतीपदाचा चार्ज ठेवू शकता, असे जयंत पाटील म्हणाले. विधानमंडळाच्या सचिवांचे काम राज्यपालांना सभापतीपद रिक्त असल्याचे कळवणे महत्त्वाचे असल्याचे म्हटले. तर भाई जगताप यांनी सभापती पदाचा विषय हा महत्त्वाचा आहे. हे पद इतकी वर्ष रिकामे असताना आपल्या सचिवालयाने राज्यपालांना कळवले का याचे उत्तर तात्काळ हवे, अशी मागणी केली होती.

लातूर हरितोत्सव...

ढमाले, सतीश नरहरे, डॉ. संदीपन जगदाळे यांच्यासह विविध शासकीय विभागांचे अधिकारी, ग्रीन लातूर संघटना, वसुंधरा प्रतिष्ठान, लातूर वृक्ष टीम आदी पर्यावरण संघटनांचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

लातूर जिल्ह्यातील वृक्षाच्छादन अतिशय कमी आहे. हे प्रमाण वाढविण्यासाठी जिल्ह्यात वृक्ष लागवड मोहिमेला लोकचळवळीचे स्वरूप येणे गरजेचे आहे. त्यामुळे वृक्ष लागवडीविषयी नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी, यासाठी जिल्हा प्रशासनाने माझं लातूर, हरित लातूर या मोहिमेंतर्गत हरितोत्सव २०२४

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि शिवसेना अमेरिकन विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात

लातूर/प्रतिनिधी- हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि शिवसेना यांचा इतिहास अमेरिकन विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात समाविष्ट आहे. ही मराठी माणसांसाठी अभिमानाची बाब आहे अशी माहिती व्यंगचित्रकार प्रशांत आष्टीकर यांनी दिली.

येथील पत्रकार भवनमध्ये यासंदर्भात माहिती देण्यासाठी घेतलेल्या पत्रकार परिषदेत प्रशांत आष्टीकर यांनी सांगितले की, हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या बद्दल जगभरातील लोकांमध्ये आस्था आहे. जार्ज मेसन युनिव्हर्सिटीच्या चार्लस हॉस यांनी लिहिलेल्या तुलनात्मक राजकारण याच्या पाचव्या आवृत्तीमध्ये प्रकरण १२ मध्ये भारत हा विषय आहे. भारतातील राजकीय, आर्थिक विवेचन यामध्ये करण्यात आले आहे. काँग्रेस, भाजप या राष्ट्रीय पक्षासोबत केवळ महाराष्ट्रातील शिवसेना या प्रादेशिक पक्षाचा समावेश या विषयात करण्यात आला आहे. हिंदुस्थानातील महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यानंतर शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे छायाचित्र समाविष्ट आहेत तर अर्थतज्ञ म्हणून माझी पंतप्रधान मनमोहन सिंग यांना यामध्ये स्थान दिलेले आहे. शिवसेनेच्या कार्याविषयी माहिती आहे. बाळासाहेबांनी विदेशी कंपन्यांना केलेला विरोध, बाबरी मस्जीद उध्वस्त प्रकरण, मुंबईतील दंगल अशा मुद्यांचा समावेश करण्यात आला आहे. अमेरिका तसेच जगातील अनेक विद्यापीठानून बाळासाहेब ठाकरे शिकविले जातात.. बाबसाहेबांनी मअसाही शिब्यून महया जपानी दैनिकात व्यंगचित्रकारीता केली आहे. चर्चीलवरील पुस्तकात साहेबांची व्यंगभित्रे समाविष्ट आहेत. जागतिक दर्जाचे व्यंगचित्रकार बाबासाहेबांनी शिवसेना सुद्धा जागतिक स्तरावर नेवून ठेवली असेच म्हणावे लागेल असेही प्रशांत आष्टीकर यांनी सांगितले.

टी.सी.हरवली आहे

व्यंकट दशरथ अंब्रे या नावाची ६ वी पासची जिल्हा परीषद देवर्जन शाळाची टीसी देवर्जन ते लातूर प्रवासात हरवली आहे. तरी कोणास सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

मोबा-९६६५७४४२१७

CHANGE OF NAME DECLARATION

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER : QURATUL AIN PATHAN TO : QURATULAIN SHOEBMAHMAD PATHAN HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE QURATULAIN SHOEBMAHMAD PATHAN IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE, CHILDREN AND RELATIVE

OLD NAME
QURATUL AIN PATHAN
NEW NAME
QURATULAIN SHOEBMAHMAD PATHAN
ADDRESS
ZINGANAPPA GALLI, LATUR, DIST LATUR, MAHARASHTRA, 413512

CHANGE OF NAME DECLARATION

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER : ATTAR NOMAN NADEEM TO: NOMAN NADIM ATTAR HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE NOMAN NADIM ATTAR IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE, CHILDREN AND RELATIVE

OLD NAME
ATTAR NOMAN NADEEM
NEW NAME
NOMAN NADIM ATTAR
ADDRESS
NEAR OLD KAZI NAKA POLICE CHOWKI, NAWAB MOHALLA, LATUR, DIST LATUR, MAHARASHTRA, 413512

जाहिर प्रगटन

लातूर जिल्हा परिसरातील तमाम जनतेस या जाहिर प्रगटना द्वारे सुचीत करण्यात येते कि, माझे पक्षकार नईम इस्माईल मुलाणी रा. लातुर आणि रसुल सत्तार शेख रा. शेदोळवाडी ता. निलंगा यांनी मला दिलेल्या माहिती व कागद पत्रावरुन व वकिल म्हणून अधिकृत केले वरून सर्व जनतेस खालील प्रमाणे जाहिर प्रगटन माझे पक्षकार यांनी मुळ मालक दत्तात्रय देवीदास सपाटे रा. चांडेश्वर ता. लातुर यांची वडीलोपार्जीत मालकी कब्जेवहीवाटची शेतजमीन मौ. चांडेश्वर ता. जि. लातूर येथील जमीन गट नं. ३५/१ मधील मालकीच्या १ हे. ४७ आर पैकी ०५ आर (५४४५ चौ फु) क्षेत्र याची चर्तुः सिमा पूर्वेस पांडेश्वर ते खोपेगाव रस्ता पश्चिमेस-तावरजा डाव कॅनॉल दक्षिणेस-लिहुण देणार यांची उर्वरीत क्षेत्र उत्तरेस-तावरजा डाव कॅनॉल

येणे प्रमाणे वरील चतुः सिमेच्या आतील मिळकत विद्यमान मालकाकडून ठरावपत्र करुन घेवुन, इसारापोटी कांही रक्कम माझे पक्षकाराकडुन स्विकारुन सदरचा प्लॉट हा निर्विवाद व निर्जोखीम असल्याची हमी माझे पक्षकारास दिली आहे. तरी सदर प्लॉटबाबत जर कोणाचा उजर, आक्षेप, हितसंबंध, हक्कसंबध, कर्जबोजा, गहाणखत, बक्षीसपत्र, कोर्ट डिक्री, मृत्युपत्र, तारण, लीज, शेजाऱ्याचा वाद, शासकीय अथवा निमशासकीय कर्ज, न्यायालयीन वाद असतील तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झाले पासुन सात (०७) दिवसाचे आत माझे खालील दिलेल्या कार्यालयीन पत्यावर योग्य त्या कागदपत्रांसह लेखी उजर / आक्षेप दाखल करावा व त्याची रितसर पोहंच घ्यावी. मुदतीमध्ये जर कोणाचा उजर / आक्षेप नाही आल्यास सदरचा प्लॉट हा निर्विवाद व निर्जोखीम आहे असे गृहित धरुन माझे पक्षकार सदर प्लॉटचे नोंदणीकृत खरेदीखत मुळ मालकाकडून आपल्या हक्कात करुन घेतील व त्यांनतर येणारे आक्षेप माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

सबब हे जाहिर प्रगटन.

तर्फे

ॲड. अशोक ज्ञा. लोखंडे
नोटरी भारत सरकार.
शाहू चौक, लातूर
मो. नं ९४२१९ ८६४९५.

जाहिर प्रगटन देणार
नईम इस्माईल मुलाणी
रसुल सत्तार शेख
मो.नं. ९८९०६ ४८४९७

CHANGE OF NAME DECLARATION

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER : SHOEB MAHAMAD PATHAN / SHOEB PATHAN TO: SHOEBMAHMAD MOAJJAMKHAN PATHAN HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE SHOEBMAHMAD MOAJJAMKHAN PATHAN IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE, CHILDREN AND RELATIVE

OLD NAME
SHOEB MAHAMAD PATHAN /SHOEB PATHAN
NEW NAME
SHOEBMAHMAD MOAJJAMKHAN PATHAN
ADDRESS
ZINGANAPPA GALLI, LATUR, DIST LATUR, MAHARASHTRA, 413512

कल्याण बाजार

१४९	४-६	२६८
२३९		७९०
४३-३४		६८-८६

मिलन नाईट बाजार

१४०	५-७	११५
२३०		२२३
६८-८६		७२-२७

गोल्डन विक्री चान्सेस

प्रो. योगेश कुमार
स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.
संपर्क 99 93 94 16 69
98 98 20 38 88

नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

मिलनम डे

कल्याणम

उदय-अस्त		सिंगल:९-५-७ मजबुत		
130	७-४	124	जोड	40-67-91-82-75
248		467		
220		700		

कल्याणम

उदय-अस्त		सिंगल:०-३-७ मजबुत		
127	४-०	158	जोड	06-24-39-57-48
280		680		
460		455		

मुंबैम (मेन)

उदय-अस्त		सिंगल:७-१-४ मजबुत		
१७९	०-७	१४५	जोड	72-30-18-45-09
२९८		२३५		
३७७		५५०		

संपर्क 99 75 47 98 26

लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. उदगीर
नगरपरिषद, उदगीर जि. लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना

कालावधी	व्याजदर
३० ते ४५ दिवस-	५.५०%
४६ ते १८० दिवस	७.५०%
१८१ ते ३६५ दिवस	८.५०%
१२ महिने ते २४ महिने	९.७५ %
२४ महिने ते ३६ महिने	१०.५०%
३६ महिने ते ६० महिने	११%
लोकमान्य मासीक व्याज प्राप्ती ठेव योजना	१०%

९% आवर्त ठेव द.सा.द.शे, ०.५०% अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट, ७८ महिने, वैयक्तिक कर्ज व इतर कर्ज १६%, सोने तारण कर्ज १४%, वेअर हाऊस कर्ज १६%, वरिल सर्व ठेवीवर नियम व अटी लागू.

यशवंत
मंगळवार दि. १६ जुलै २०२४

पान ८

उदगीर

कार्यालय :०२३८५-२५३९९८ मो.९८५०२२८२४०
email - yashudgirram@gmail.com

बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.
शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

कालावधी	व्याजदर	जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर
३१ दिवस ते ४५ दिवस	६.००%	६.५०%
४६ दिवस ते १८० दिवस	७.००%	७.५०%
१८१ दिवस ते ३६५ दिवस	८.००%	८.५०%
१ वर्ष १ महिना ते २ वर्ष	९.००%	९.५०%
२ वर्ष १ महिना ते ३ वर्ष	९.२५%	९.७५%
३ वर्षापुढील मुदतीकरीता	१०.००%	१०.५०%

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)
दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

उपलब्ध सुविधा
वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग

पुढील पिढीला वाईट दिवस येवू द्यायचे नसेल तर झाडे तोडु नका वृक्षारोपण व संवर्धन करा-मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर

उदगीर (प्रतिनिधी) पुढील पिढीला वाईट दिवस येवू द्यायचे नसेल तर वृक्षारोपण व संवर्धन करा असे आवाहन लातूर जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी व्यक्त केले.

उदगीर तालुक्यातील बामणी येथे ग्राम पंचायतच्या वतीने व माझी लाडकी बहिण मेळावा व विविध विकास कामाचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल सागर यांच्या हस्ते या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तहसिलदार राम बोरगावकर तर प्रमुख पाहुणे म्हणून उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय गिरी, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रविण सुरडकर, मनरेगा गटविकास अधिकारी संतोष माने, गटविकास अधिकारी स.सचिन पाटील, पाणी पुरवठा विभागाचे नारागुडे, कनिष्ठ अभियंता अजीम उस्ताद, विस्तार अधिकारी बालाजी केदासे आदि उपस्थित होते.

प्रारंभी ग्राम पंचायतच्या वतीने सरपंच सौ. प्रभावती राजकुमार बिराजदार, उपसरपंच दिलीप कांबळे, व सदस्यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी विविध विकास कामाची भेट देवून पाहणी केली. व महाराष्ट्र शासनाच्या विजबिलमुक्त अभियानांतर्गत ग्राम पंचायतच्या वतीने उभारण्यात आलेल्या सौर उर्जा पॅनलचे उद्घाटन करण्यात आले. तर लातूर जिल्हयातील वसुंधरा रोपवाटिकेचे उद्घाटन उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय गिरी यांच्या हस्ते झाले. खेलो लातूर अंतर्गत मनरेगाच्या माध्यमातून उभारण्यात येणाऱ्या क्रिंडागणाचे भुमीपुजन अनमोल सागर यांच्या हस्ते करण्यात आले.

एक पेड माँ के नाम अंतर्गत मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर मातोश्री सौ. आशाराणी सागर , दत्तात्रय गिरी यांनी आपल्या मातोश्री, तहसिलदार राम बोरगावकर मातोश्री सौ. गिरजा बोरगावकर, गटविकास अधिकारी प्रविण सुरडकर यांच्या मातोश्री सौ. शशिकला सुरडकर यांच्या नावाने वृक्षरोपण केले.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी बामणी ग्राम पंचायतच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमाचे कौतुक करुन म्हणाले की, लातूर जिल्हयातील बामणी ग्राम पंचायतच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेवून मनरेगातून क्रिंडागण उभे करण्यासाठी निवड केल्याचे सांगीतले.

अंकुश बिराजदार , ग्राम विकास अधिकारी बी.के. कांबळे, भीम मांडोळे ,धनाजी भोसले, ग्रामसेवक विनोदकुमार खरात, नरेंद्र पांचाळ, वन परिमंडळ अधिकारी रामेश्वर केसाळे, सुभाष वटपलवाड, तलाठी अपर्णा डोईजोडे, मनरेगा सहाय्यक कार्यक्रम अधिकारी अविनाश ढवळे, तांत्रिक सहाय्यक पंढरीनाथ माने, अक्षय खादीवाले, दत्ता मद्दे, राहुल पोतदार, कृष्णा नागरगोजे , स्वच्छ भारत मिशनचे महादेव माने तसेच बामणी गावातील सरपंच सौ.प्रभावती राजकुमार बिराजदार, उपसरपंच दिलीप कांबळे, ग्रामसेवक संजीव गुरमे ,ग्रामपंचायत सदस्य नामदेव म्हेत्रे , दादाराव इंचुरे, सौ. कोंडाबाई सोपान कांबळे , माजी चेअरमन काशिनाथ बिराजदार, व सर्व ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोजक राजकुमार माणिकराव बिराजदार सदस्य संजय गांधी निराधार समिती यांनी मांडले तर सूत्रसंचालन ग्राम विकास अधिकारी बी.के. कांबळे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता अंगणवाडी कार्यकर्ती ज्योती सातळे, सुनिता सावरे, शरयु बिरादार, विमल जाधव , आशा कार्यकर्ती रूपा कांबळे, ग्रामरोजगार सेवक उत्तम बिरादार, प्रकाश वल्लीपुरे, पा.पू. सभापती शिवदास गंगापूरे, ग्राम पंचायत कर्मचारी मुरलीधर लासुने, राम इंचूरे, संग्राम कांबळे, राजेंद्र कांबळे, आनंद कांबळे, रामचंद्र कांबळे व इतर सर्व ग्राम स्थांनी कार्य केले.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची जनजागृती

तहसिलदार सुरेखा स्वामी यांनी साधला महिलांशी संवाद .. !

जळकोट (माधव होनराव) महसूल विभागामार्फत मम ख्यमंत्री-माझी लाडकी बहीणफ योजनेबाबत ग्रामीण भागात जळकोट तालुक्यात जनजागृती केली जात आहे. तहसीलदार सुरेखा स्वामी यांनी ठिकठिकाणी महिला व ग्रामस्थांसोबत संवाद साधून या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

जळकोट तालुक्यातील प्रत्येक गावात शिबिर घेऊन नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, सरपंच यांच्या उपस्थितीत या योजनेबाबत माहिती दिली जात आहे. जास्तीत जास्त महिलांना या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे तहसीलदार स्वामी यांनी सांगितले. तालुक्यातील कुणकी, जिरगा, विराळ आदी गावात जनजागृती केली असून शुक्रवारी घोणसी येथे या योजनेबाबत तहसीलदार स्वामी यांच्याकडून मार्गदर्शन केले. तसेच वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी तहसीलदार सुरेखा स्वामी, नायब तहसीलदार गुट्टे, तलाठी अनिल उमाटे, सरपंच, उपसरपंच, ग्रा.प सदस्य, पोलीस पाटील महाई-सेवा केंद्र चालक, आंगणवाडी ताई, आशा, अंगणवाडी मदतनीस, चेअरमन, बिएल ओ, गावातील महिला तसेच जि. प.प्रा शाळा घोणसी येथील विद्यार्थी उपस्थित होते.

संत ज्ञानेश्वर माऊली प्रा.विद्यालयच्या बाल चिमुकल्या वारकऱ्यांच्या पावलांनी प्रति पंढरीची वारीने उदगीर नगरी दुमदुमली

उदगीर (प्रतिनिधी) संत ज्ञानेश्वर माऊली प्रा .विद्यालय,उदगीर शाळेने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी विविध उपक्रमातून उद्याचे भावी भविष्य तयार करण्यासाठी एक उपक्रम व विद्यार्थ्यांना वारी कशी असते हे दाखवण्यासाठी वारीचा ,एक भाग आषाधी कार्तिकी वारी च्या निमित्ताने वारकरी पंढरपूर ला पायी चालत जातात ,त्याचाच एक भाग प्रती पंढरी च्या वारीने उदगीर नगरीत तयार करून त्यात अनेक विद्यार्थी वारकरी च्या वेशभूषा करून आलेले होते ,काही विद्यार्थी संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत निवृत्ती, संत सोपान, विठ्ठल ,रुख्मिणी ,विविध साधू संत होऊन आलेले होते ,तसेच सर्व मुर्लीनी डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन,हातात भगवी पताका,तसेच टाळ ,मृदंग च्या साथीने महाराष्ट्र ची संस्कृती दाखवलेली होती ,या वेळी डोक्यावर टोपी ,विना ,टाळ च्या साह्यायाने विठ्ठल विठ्ठल विठ्ठला ,ज्ञानबा तुकाराम ,अश्या जयघोषात उदगीर नगरीतील परिसर दुमदुमला होता .या वेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.जगताप ,शाळेतील शिक्षिका खुळे ,श्रीमती मेटकर ,पवार मॅडम यांनी फ्फुगडी खालून संस्कृती दर्शन केले,तसेच शाळेतील शिक्षक आडे यांनी वेगवेगळी भक्ती गीते नृत्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनकडून करून घेतले ,तसेच पेटे, वट्टमवार ,कोयले खंदाडे, वाडकर ,जाधव ,सूर्यवंशी, .डी. एस. बिरादार सर उपस्थित होते .त्यांनी भगवी पताका घेऊन वारीत ऊर्जा आणत होते .या वेळी परिसरातील विविध नागरिक यांनी विद्यार्थ्यांना केळी ,पाणी ,बिस्कीट तसेच दुधीया हनुमान येथे जेवण दिले या वेळी संस्थेचे अध्यक्ष गोविंदराव निटूरे तसेच उदगीर नगरी मधील अनेक नामांकित व्यक्तींनी शाळेतील बाल वारकऱ्यांचे खूप खूप कौतुक केले.

उदयगिरीत नवप्रवेशितांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत



उदगीर (प्रतिनिधी) येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात अकरावी विज्ञान प्रवेशित विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ.आर.के.मस्के, उपप्राचार्य एस.जी. कोडचे, पर्यवेक्षक प्रा.जे.आर.कांदे, प्रा.एस.वि.मुडपे,प्रा.टी. एन.सगर, प्रा.पी.वाय. जालनापुरकर, प्रा.प्रवीण जाहुरे, प्रा.महेश धनाश्री, प्रा एस.बी.येडले, प्रा.एन.के.खांडेकर, प्रा. एस.टी.कांबळे, प्रा.समगर एम.डी, प्रा.बळवंत पी.बी., प्रा.वळवी ए.के, कार्यालयातील दीपक पाटील मलकापूरकर, एस.एस. वारंगकर, शेख अजीम ोद्दिन, दिलीप होळकर, सूर्यकांत फ्फड यांची उपस्थिती होती. यावेळी विद्यार्थ्यांना संबोधित करताना प्राचार्य डॉ.मस्के म्हणाले विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून यशाचा ध्यास घेऊन शिक्षक जे सांगतात त्या सूचनांचे पालन करून आई-वडिलांच्या अपेक्षाची पूर्तता करावी असे आवाहन करून नवीन शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कै. विठ्ठलराव केदार प्रतिष्ठानचे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

उदगीर (प्रतिनिधी) उदगीर तालुक्यातील देउळवाडी येथील कै. विठ्ठलराव केदार प्रतिष्ठानच्या वतीने सन २०२३ चे मराठी भाषेतील उत्कृष्ट साहित्यिकृतीना देण्यात येणारे पुरस्कार गुरूवारी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अंबादास केदार यांनी जाहीर केले आहेत.

परभणी येथील कथालेखक बाबा कोटंबे यांच्या बयनाम ा या कथासंग्रहास नाशिक येथील कवी विवेक उगलमुगले यांच्या मनातल्या मनात वाचायच्या कविता या कवितासंग्रहास जाहीर करण्यात आला आहे.

कादंबरी विभागातून बीडचे परशुराम नागरगोजे यांच्या पाचाट या कादंबरीस तर ललित विभागातून श्रीमती प्रतिभा सराफ मुंबई यांच्या अनाकलनीय या ग्रंथास जाहीर झाले आहेत.

नांदेड येथील डॉ. देविदास तारू यांच्या ङ्ग आता मव्हं काय!ङ्घया आत्म कथनास हे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत.

डॉ. भास्कर बडे ,(मराठवाडा साहित्य परिषद, केंद्रीय कार्यकारणी सदस्य छ.संभाजीनगर यांच्या अध्यक्षतेखाली निवड समितीत कवि गोविंद कुलकर्णी, लक्ष्मण बेंबडे ,डॉ. रेखा ढगे , डॉ. उमेश मुंडे , जयश्री वाघ ,ज्ञानेश्वर हंडरगुळीकर, अनंता सूर, यांनी २०७ ग्रंथातून ही निवड केली असल्याचे प्रतिष्ठानचे अध्यक्ष अंबादास केदार व सचिव देविदास केदार यांनी पत्र परिषदेत ही माहिती दिली .लवकरच एका विशेष कार्यक्रमात सदरील पुरस्कार वितरण सोहळा मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे .

विश्वजीत गायकवाड फाउंडेशन तर्फे आषाढी महोत्सवात विविध कार्यक्रम आणि स्पर्धा

उदगीर (प्रतिनिधी) ईच्छा असूनही आषाढी एकादशी निमित्त पंढरपूर येथे पालखी सोहळ्यात सहभागी होऊ शकले नाही अशा वारकऱ्यांसाठी इंजि. विश्वजीत अनिलकुमार गायकवाड फाउंडेशन माफर्फत विठू नाम सोहळा आयोजित केला आहे .

ललित भवन मंगल कार्यालय येथे बुधवार दिनांक १७ जुलै रोजी आषाढी एकादशी निमित्त आयोजित आषाढी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात सकाळी नऊ ते बारा ऐकावा विठ्ठल पहावा विठ्ठल अभंग वाणी सादर करण्यात येणार आहे , तर दुपारी १२ ते ४ पहिली ते पाचवी वर्गातील विद्यार्थ्यासाठी वारकरी वेशभूषा स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे . सायंकाळी या स्पर्धेतील बाल वारकऱ्यांना बक्षीस वितरण करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात भक्तासाठी उपवासाची व्यवस्थाही केलेली आहे. या कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त भाविक भक्तासह बाल वारकऱ्यांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन इंजि. विश्वजीत अनिलकुमार गायकवाड फाउंडेशन मार्फत करण्यात आले आहे

पाहिजेत

D.Pham. **शिकलेला मुलगा किंवा मुलगी मेडीकलमध्ये पूर्ण वेळ कामासाठी पाहिजे.**
त्वरीत भेटा
वरदलक्ष्मी मेडीकल
C/o *डॉ. सोनी, नांदेड नाका, उदगीर*
संपर्क : ९८९०३१७३८३